# माणूस

३१ मे १९६९ चाळीस पैसे





"आपली तर कमाल आहे, समर्थ ! आपण आमच्यासाठी आयुष्यभर हेरगिरी केलीत, आपण आमचे आश्रित होता असे ऐकतो; पण शेवटपर्यंत खुद्द आम्हालामुद्धा ह्या दोन्ही गोष्टींचा पत्ता लागू दिला नाहीत ! गुप्तता राखावी तर अशी ! ! बहोत अच्छा. . . ." औरंगजेब



" कोणीतरी अधिक संशोधन करून समर्थ ब्राह्मणच नव्हते असं का सिद्ध नाही करीत ? निदान त्यामुळे त्यांची अधिक अब्रू तरी वाचेल......"

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : त्रेपन्नावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मे, २१

गेल्या १७ तारखेच्या अंकात 'मुक्ताफळे' या सदरामध्ये आपल्या ग्यानबांनी श्री. विनोबा भावे हे 'ब्रिटिशांचे व परकियांचे हेर होते' ही गंभीर बातमी देऊन म. गांधींशी त्यांनी जी प्रतारणा केली व करीत आहेत ते उघडकीस आणून जे उत्कृष्ट असे लोकशिक्षणाचे, संशोधनाचे कार्य केले त्याबद्दल शतशः धन्यवाद.

**भद्रसेन वाढई**, मुंबई

[ १७ मेच्या अंकातील 'ब्रिटिशांचे हेर विनोबा भावे' हे ग्यानबांचे उपरोधिक 'मुक्ताफळ' रामदासांनी औरंगजेबासाठी हेरगिरी केली, या 'नव' संशोधनाला अनुलक्षून होते, हे ध्यानात न घेतल्यामुळे काही जणांचा गैरसमज झालेला दिसतो ! —संपादक ]

स. न. मे, २२

आपला १७ मेचा 'माणूस'चा अंक वाचला. 'मुक्ताफळे' एकदम टॉप. 'ब्रिटिशांचे हेर विनोबा' हा लेख फार आवडला. 'बहुजन समाजाचे कैवारी' या बुरख्याखाली वावरून मोठमोठ्या व्यक्तींवर चिखलफेक करायची वृत्ती हल्ली फारच बोकाळली आहे. उद्या विनोबांच्यावरही असा आक्षेप घ्यायला हे लोक कमी करणार नाहीत.

**श्रीकांत कुलकर्णी**, कोल्हापूर

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५१

३ मेच्या अंकातील सु. ल. सोमण लिखित 'कामगार चळवळ—नवी चाहूल' या विषयावर गिरणगावातील एका घर मालकाने व्यक्त केलेले विचार.

सदानंद नार्वेकर

# मालक-भाडेकरू यांच्यातील

'माणूस'च्या ३ मे च्या अंकातील श्री. सु. ल. सोमण यांचा 'कामगार—चळवळ' हा लेख वाचला. त्यातील राहत्या जागांसंबंधीचे विचार मननीयच आहेत. मी स्वत: या गिरणगावातील एक घरमालक आहे. त्यामुळे उपरोक्त लेख वाचल्यानंतर सुचलेले काही विचार प्रसृत करणे मला योग्य वाटते !

वरचेवर उद्भवणाऱ्या चाळींच्या दुरुस्तीबाबत केवळ एकाच वर्गास दोष देणे योग्य होणार नाही, असे मला वाटते. १९४८ सालापासून भाडेवाढच फक्त झालेली नाही; बाकी मात्र इतर सर्व वस्तूंचे भाव वाढलेले आहेत. चाळींमधून राहणाऱ्या भाडेकरूंच्या कुटुंबियांमधून जशी वाढ झाली आहे, तशीच त्यांच्या उत्पन्नामधूनही वाढ झालेली आहे. उत्पन्नावर भाड्याचा आकार ठरविणारे 'गृहनिर्माण मंडळ'ही इमारतीच्या दुरुस्तीपुढे हतबल झाले आहे. मग ज्यांच्या इमारतीचे गेल्या कित्येक वर्षांत भाडे वाढलेले नाही, त्यांची अवस्था काय होत असेल याची कल्पनाच

केलेली बरी ! सध्याच्या बदलत्या समाजरचनेमध्ये जुन्या भाड्याच्या चाळीचा मालक होणे, हा एक मोठा गुन्हा होऊन राहिला आहे.

घरमालक हाही आपल्याच समाजाचा घटक आहे, तोही बहुसंख्येने मध्यमवर्गीयच आहे. या स्वतंत्र देशामध्ये आनंदाने व सुखाने जगण्याचा त्याचाही हक्क आहे, सर्वसामान्य जनतेचाच तोही एक घटक आहे, याकडे सर्व संबंधित कार्यकर्ते व जनता सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत असते. "इतकी वर्षे भाडे खाल्लेत त्याचे काय ?" असा प्रश्न विचारणे योग्य आहे काय ? भाडे देताना आपल्या कुटुंबाला आणि स्थैर्यालाही याच इमारतीने आसरा दिलेला आहे, इमारतीमध्ये पैसे गुंतविण्याची इच्छा केलेल्या मालकामुळेच हा आधार मिळालेला आहे, हेही विसरण्याचा कृतघ्नपणा आपण केलाच पाहिजे काय ?

आपल्या हक्कांबाबत आपण सर्वच दिवसेंदिवस फारच जागृत होत आहोत ही चांगली गोष्ट आहे; पण त्याचबरोबर आपल्या जबाबदाऱ्यांबाबत मात्र उदासीन होत आहोत त्याचे काय ? जनतेच्या हक्काच्या जागृतीबाबत अटीतटीने प्रयत्न करणाऱ्या निरलस कार्यकर्त्यांचे, जनतेला तिच्या जबाबदारीची जाणीवही करून देण्याचे कर्तव्य आहे. न्याय्य हक्क मिळवून देणाऱ्या या निरलस कार्यकर्त्यांचेच जनता ऐकेल, विश्वास ठेवील, अगर भीतीपोटी आपली जबाबदारी पार पाडील. [वर उल्लेखिलेल्या कार्यकर्त्यांमध्येच कामगार कार्यकर्ते वसामाजिक कार्यकर्ते

## समजुतीनेच हा प्रश्न सुटेल !

यांचा उल्लेख अभिप्रेत आहे.] केवळ हक्कजागृतीच्या जाणिवेमुळे मात्र मालक आणि नोकर, घरमालक–भाडेकरु, सरकार–जनता यांच्यांत असलेल्या संबंधांमधील सौहार्द लुप्त होऊन उलट अंतराय निर्माण होत चालली आहे अन् त्याचा परिणाम म्हणून सामायिक सुखसोयींचा बेजबाबदारीने आणि बेपर्वाईने वापर करण्याची वृत्ती दिवसेंदिवस वाढतच आहे, याचा विचार कार्यकर्त्यांनी अगदी गंभीरपणे करायला पाहिजे.

जुन्या चाळींचे घरमालक आपल्या मिळकती विकण्यास तयार होत नाहीत, हा समज चुकीचा आहे. याउलट, भाड्याच्या विशिष्ट पटीमध्ये किंमत ठरवून भाडेकरूंना पाच वर्षांच्या हप्तेबंदीच्या सवलतीने इमारत विकू पाहण्याचा प्रयत्न माझ्यासहित अनेकांनी केलेला आहे. निरनिराळ्या कार्यकर्त्यांशी, समाजसेवकांशी, नगरसेवकांशी आणि भाडेकरू प्रतिनिधींशी मी या बाबतीत अयशस्वी चर्चा केलेली आहे ! या बाबतीत कुणीही ही 'नसती जबाबदारी' अंगावर घेण्यास उत्साह

दाखविला नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

खर्चाचा भाग उचलण्याची जबाबदारी नको, बदलत्या परिस्थितीचा घरमालकांच्या दृष्टीकोणातून विचार करणे नको, सामायिक उपयुक्ततेच्या सोयी जबाबदारपणे वापरणे नको, आपण राहत असलेल्या चाळींचे 'आपले घर' म्हणून संरक्षण करणे नको, आपण राहत असलेल्या चाळीची मालकी आपणांकडे घेउन आपणांस हव्या त्या सुखसोयी प्राप्त करून घेणेही नकोच ! मग भाडेकरूना हवे तरी काय ?

सामायिक सुखसोयींच्या वस्तू अत्यंत बेजबाबदारपणे वापरणे आणि त्यांच्या दुरुस्तीस कारण होऊनसुद्धा स्वत: कायद्याच्या कचाट्यातून सुटून जाणे, खोलीमध्ये अनधिकृतपण भाडे घेऊन खानावळे, पोटभाडेकरू वगैरेंना थारा देणे, (पोटभाडेकरू किती असावेत याला काही नियम ? एका खोलीत रांगेने खिळे मारून त्या प्रत्येक खिळ्यामागे कपडे ठेवण्यास २ रु. भाडे, ट्रंक आणि वळकटी ठेवण्यास ५ रु. भाडे आणि झोपणाऱ्यास महिना १० रु. भाडे या बोलीवर जेवढे मिळतील तेवढे भाडेकरू ठेवावेत ! ) पाचशे माणसांकरिता केलेल्या सुखसोयीवर जवळजवळ तिप्पट लोकांनी अवलंबून राहणे गुंडप्रवृत्तीच्या लोकांना समाजहितास बाधक असलेल्या गोष्टी करण्याकरिता थारा देणे वगैरे, गोष्टी करून शिवाय मग घरमालकाच्या मातापित्यांचा उद्धार वेळी अवेळी करणे, हेच भाडेकरूंना हवे असते, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरेल काय ?

ज्या प्रश्नावर श्री. सोमण यांनी बोट ठेवले आहे, तो प्रश्न मात्र एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून सुटण्यासारखा नाही. त्याकरिता दोन्ही पक्षांनी एकमेकांच्या अडचणी समजून घेऊन मार्ग काढला पाहिजे ! सत्यपरिस्थितीकडे डोळेझाक करून आणि मतपेटीकडे नजर ठेवणाऱ्या सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना नेमकी हीच गोष्ट नको आहे. कमी श्रमात जास्तीत जास्त मोबदला मिळविण्याचा हव्यास आज सर्वांनाच लागलेला आहे आणि तोच आपल्या सर्वकष प्रगतीच्या मार्गातील मोठा अडसर आहे, असे मला वाटते.

आज सुस्थितीत असलेल्या इमारतीतील भाडेकरूंनी आपली सहकारी संस्था स्थापन करावी. घरमालकांबरोबर बोलणी करून किमत ठरवून पाच वर्षात हप्त्याने पैसे देण्याची (सव्याज ?) सवलत मागावी. काही विशिष्ट कारणांमुळ घरमालक काहीही सवलत देतील असे मला वाटते. चाळीची सर्व व्यवस्था भाडेकरूंनी स्वतःकडे घ्यावी. भाडेकरू स्वत: चाळीचे मालक झाले तर चाळीतील सर्व सामायिक सुखसोयीचा आणि वस्तूंचा रस्त्यावरील गुंड, फिरस्ते वगैरे चाळीशी संबंध नसणाऱ्या व्यक्ती जो गैरवापर करतात त्याकडे जास्त लक्ष देतील. जे कोणी दुकानदार-भाडेकरू या सहकारी संस्थांचे सभासदत्व स्वीकारणार नाहीत त्यांची दुकाने वा खोल्या मालकांच्या नावावर राहाव्यात. मालक हप्त्यांची सवलत देत नसेल तर कर्जउभारणी करावी. (कर्जउभारणीची जरूर भासेल असे वाटत

नाही. कारण साधारणत: ९०० ते २००० रु. पर्यंतच्या दरम्यानच खोल्यांच्या किमती होतील, असा माझा अंदाज आहे.)

ज्या इमारती मोडकळीस आल्या आहेत, त्याही मालकांकडून विकत घ्याव्यात. चाळ पडून रु. ३० या दराने जागेचा भाव मिळवू पाहणाऱ्या आणि जागेवर राहणाऱ्या शेकडो कुटुंबांना बेघर व्हावे लागणार या गोष्टीची पर्वा न करणाऱ्या मालकांवर बेशक शासकीय वा सामाजिक दबाव आणावा. अशा इमारती विकत घेतल्यावर भाडेकरूंच्या सहकारी संस्थेने अधिकृत भाडेकरूंची सोय करणाऱ्या आणि कमीत कमी सुखसोयी असणाऱ्या इमारतीची आखणी करावी. अशा इमारतीचा नवा प्लॅन कदाचित् F. S. I. च्या नव्या नियमानुसार मान्य होण्यासारखा नसेल तर सरकारने व नगरपालिकेने केवळ अशा पद्धतीच्या इमारतीकरिता F. S. I. चे नियमही थोडेसे सैल करावेत. साधारणत: ७ ते ९ हजारांच्या आसपासच प्रत्येक भाडेकरूस रक्कम बसेल अशा जागांची योजना करावयास पाहिजे. आपली स्वत:ची गुंतवणूक म्हणून रु. ४ हजारापर्यंत रक्कम तयार करणे, या वर्गास जडही जाणार नाही. सरकार, फायनान्स सोसायटी किंवा को-ऑपरेटिव्ह बँका यांजकडून कर्जाची उभारणी करावी आणि इमारत उभी करावी व सभासदांना भाडे-मालकी (Tenancy–Cum Ownership) पद्धतीने द्यावी.

अनेक जुन्या चाळी वाटेल तशा बांधलेल्या आहेत. हवा, प्रकाश, वगैरेंचा काहीएक विचार न करता उभारलेल्या आहेत. फेरबंदर येथील एका चाळीमधील बहुतेक खोल्यांनी सूर्यप्रकाश कधीच पाहिलेला नसेल. या चाळीला नावच ‘अंधार-चाळ’ असे आहे. जागा मोठी आणि खोल्या कमी अशाही अनेक चाळी आहेत. नवीन पद्धतीने आणि नियमांनुसार जर ह्या चाळी पुन्हा बांधल्या तर त्यांमध्ये आणखी काही कुटुंबांची सोय होऊ शकेल. या जागांकरिता नवीन खरेदीदार मिळणे सहजशक्य आहे. आज आपले अनेक कामगार आणि मध्यवर्गीय बांधव मुंबई सोडून बाहेरगावी राहावयास जात आहेत. किंबहुना असे बाहेरगावी जाणे त्यांना भाग पडत आहे. ही दु:खाची गोष्ट आहे. (महाराष्ट्र शासनाच्या अर्थ-खात्यातील एका अंडर सेक्रेटरी महाशयांशी याच विषयावर चर्चा सुरू असता ते म्हणाले, “चालायचेच! उद्योगधंद्याची जसजशी वाढ होते तसतसे शहरांमधून धनिक आणि कारखानदार राहू लागतात अन् मूळचे गरीब, श्रमिक आणि मध्य-वर्गीय नागरिक असेच किनाऱ्याकिनाऱ्यावर फेकले जातात, हा रॉबिनसनचा सिद्धांतच आहे” दुर्दैव आमचे दुसरे काय?) अल्प गुंतवणुकीवर जर या बाहेर-गावी राहावयास गेलेल्या कामगारांना, मध्यमवर्गीयांना मुंबईमध्येच जागा मिळू लागल्या तर ते सहजच या जागा घेऊ शकतील. बाहेरगावाहून कामाच्या ठिकाणी जाण्यायेण्यामध्ये होणारा त्यांच्या शक्तीच्या वेळचा अन् पैशाचा अपव्यय वाचविता येणे आपल्याला शक्य होऊन मध्यमवर्गीयांचे अनेक सामाजिक प्रश्नही सुटण्यास मदत

होईल हे निश्चित !

आज एकूण समाजामध्ये शिरलेले शैथिल्य, निर्माण झालेले नैराश्य केवळ या गैरसोयीच्या राहणीमानामुळे मिळणाऱ्या असमाधानानेच सुरू झालेले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. या गोष्टीकडे लक्ष देणे सरकारलाही आता गरजेचे वाटू लागले आहे. या अशा पद्धतीच्या घरांना कर्ज देण्याकरिता पैसा उभारणे केवळ महिन्याभरात लॉटरीची तिकिटे विकून १ कोटी रुपये मिळविणाऱ्या सरकारला अशक्य आहे असे मला तरी वाटत नाही ! घरदुरुस्तीसारखे विधेयक करून ती योजना राबविण्याकरिता नवीन शासन यंत्रणा उभारून भाडेकरूंवर भाड्याच्या जास्तीत जास्त ६० टक्के इतका बोजा टाकण्यापेक्षा हे अधिक सोपे आहे. शिवाय सरकारच्या शासनयंत्रणेवर आता जनतेने तरी किती विश्वास ठेवावा हा प्रश्नच आहे ! सरकारच्या चांगल्या चांगल्या योजना सर्वसामान्यांपर्यंत धडपणे पोहोचतच नाहीत. सरकारी योजना आणि सर्वसामान्य माणूस यांमध्ये असलेला शासनयंत्रणेचा प्रचंड सागर या योजनामधील सर्व गोडवा बिरघळून टाकतो अन उरतो फक्त कडवट अनुभव ! सामान्य माणसाने आता सर्वच गोष्टींकरिता सरकारवर विसंबून राहणे सोडूनच दिले पाहिजे. "देश मला काय देईल, यापेक्षा मी देशाला काय देऊ शकेन, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे" हे प्रे० केनेडींचे वाक्य प्रत्येक व्यक्तीने स्मरणात ठेवले पाहिजे.

झोपड्यांमधून राहणाऱ्या जनतेमधून अनेक कार्यकर्ते कार्यकरीत आहेत. या उपेक्षित समाजाकडे दुर्लक्ष करून आता चालण्यासारखे नाही. 'स्लम क्लिअरन्स' योजनेखाली या झोपडीनिवासी लोकांना मिळणाऱ्या खोल्या ते 'सर्व संबंधित असामींच्या सहकार्यानेच विकून टाकतात हे अगदी खरे आहे. एक तर त्यांना या खोल्या नकोच असतात, शिवाय या व्यवहाराने रोख रक्कमही मिळण्याची ही संधी असते या कारणास्तव ते परत झोपडीमधूनच राहिलेले दिसतात. मुंबईच्या आसपास अनेक ओसाड जागा आहेत. त्या ठिकाणी नीट आखणी करून फक्त झोपड्याच बांधाव्यात पक्क्या ! वाहून जाणाऱ्या 'नगरां'सारख्या नव्हेत ! गावातून बांधलेली शेतकऱ्यांची चंद्रमौळी घरे वर्षानुवर्षे टिकतातच की नाही ? त्याच पद्धतीच्या झोपड्या बांधाव्यात. अर्थात रस्ते, पाणी वीज, सांडपाण्याची व्यवस्था, संडास, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी जागा, बाजार, शाळा, दवाखाना, इस्पितळ वगैरे सुखसोयी या जनता नगरांतून असाव्यात. अशी एखादी 'जनता कॉलनी' तयार झाली की शहरातील एक झोपडी विभाग तेथे हलवावा आणि तेथे श्रमिकनगरे उठवावीत कामगार आणि मध्यमवर्गीयांसाठी !

मोठ्या टोलेजंग इमारती बांधण्याचा वेगही आता मंदावला आहे. कारण आता या जागांना गिऱ्हाईक कमी आहे. उद्योगधंद्याच्या बदलत्या परिस्थितिनुसार श्रीमंत लोक अथवा कंपन्या नवीन गुंतवणुकीच्या भानगडीमध्ये सहसा पडत नाहीत.

मध्यमवर्गीयांपैकी जरा 'हायर' असलेला 'क्लास' (White Collared) या बाबतीत बराचसा सुखी आहे. जेथे नोकरी करायची तेथेच इतर सहकाऱ्यांसमवेत सहकारी सोसायटी तयार करून मालकांकडून कर्ज मिळवून स्वत:करिता राहण्याच्या जागा तयार करणे, या वर्गास सहज शक्य झाले आहे. आपल्या नोकरांच्या घरबांधणी संस्थांना अल्पव्याजाने अथवा बिनव्याजाने कर्ज देण्यामध्ये व्यापारी बँकांनी तर आघाडी मारली आहे हे निःसंशय प्रशंसनीय आहे! इमारत बांधकामाचा धंदा करणाऱ्यांना आता हे मध्यमवर्गीयांचेच गिऱ्हाईक शिल्लक आहे. या वर्गामधूनही जवळ चार पैसे साठवून असलेली कुटुंब आहेत. केवळ एका सोयीकरिता सर्वच गैरसोयी सोसून अशी कुटुंबे शहरातील जुन्या चाळींमधून राहत आहेत. शहरांमध्ये तयार होणाऱ्या अल्पमोली जागांना हे गिऱ्हाईक मिळणे शक्य आहे.

शहरांमधल्या जागा मात्र फारच महाग आहेत. जेथे प्रत्यक्ष सरकार आपल्या जागेस ५००० रुपये मीटर असा दर मिळावा, अशी अपेक्षा करते, तेथे सामान्य माणसांच्या अपेक्षा न वाढल्या तर नवल! शहरांमधून अनेक खासगी अथवा सरकारी जागांवर झोपडपट्टी बसली आहे. या झोपडपट्टीने व्यापलेली जागा रिकामी करण्यापूर्वी सरकारने ती भाडेपट्ट्याने आपल्या ताब्यामध्ये घेतली पाहिजे आणि त्यावर अशी श्रमिकनगरे वसविली पाहिजेत. तरच या जागा खरेदी करणे या मध्यम वर्गीयांना शक्य होणार आहे.

हा प्रश्न सर्वांच्या सहकार्याने सोडविण्याची जिद्द ठेवली पाहिजे तर ध्येय निश्चित साध्य होईल! आज मुंबईमधून बाहेरगावी राहावयास जाणाऱ्या मध्यमवर्गीय तसेच कामगार बांधवांमुळे भावी काळात या मुंबईवर एक मोठे संकट कोसळण्यासारखी परिस्थिती निर्माण होत आहे, याचा विचार महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळाने व शासनाने जरा गंभीरपणे करावा. वर्गविग्रहाच्या भावनेवर जोपासल्या जाणाऱ्या नेतृत्वाला सर्व वर्गांची एकजूट करून छेद दिला गेला पाहिजे. सतत आव्हानाच्या भाषेमध्ये गर्जना करणाऱ्या कार्यकर्त्यांनी जरा अंतर्मुख होऊन या प्रश्नाचा साकल्याने विचार करावा. असंतोषाचा अग्नी फुंकर मारून अथवा दुर्लक्ष करून जिवंत ठेवण्याचे पाप आपण सर्वजणच करीत आहोत. हा अग्नी वेळीच विझविण्याकरिता आपण सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. नाहीतर उद्या केव्हातरी हा अग्नी एकदम प्रज्वलित होऊन प्रलयकारी रूप धारण करील आणि जे जे सुंदर आहे, चांगले आहे, त्या सर्वांचीच राखरांगोळी करील. याची जाणीव मनामध्ये ठेवून सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी आताच कामास लागले पाहिजे!

# तुझे स्मृतिदिन

वीर विनायक, तू कदी नायक, क्रांती तेज हिरा
तुझ्या वर्णना, सदैव अपुरी अचूक शब्द गिरा ।।

परवशतेच्या नभात तूचि पाजळिला पोत
देशप्रीतीचे दीप उजळिले असंख्य हृदयांत ।।

साहस, धृती, तव अतुला प्रीती प्रिय देशासाठी
कुणि न साहिले दुःसह आयू तुझ्यापरी अजुनी ।।

समग्र जीवन तुझे जाहले, स्वतंत्रता–स्तोत्र
उदात्त, उन्नत, महन्मधुर रसी रंगे तव चरित ।।

सरस्वतीचा दिव्य पुत्र तू, उधळिली वाक्सुमने
सुगंध त्यांचा मोहवी सकला, अमर तुझी कवने ।।

रानफुले नच, दिव्य औषधी राष्ट्ररक्षणाची
तुवा ठेविला अमोल ठेवा सिद्धांता माजी ।।

दूर भयाने उभा मृत्यू त्या आग्रही बोलविले
मृत्युंजय तू उघडचा नयनी त्यासही स्वागतिले ।।

दिव्य यज्ञ समिधासम जीवन, मरण तुला कसले
तुझे पुण्यदिन सदैव फुलतिल, उधळित ज्ञानफुले ।।

– सौ. निर्मला वैद्य

२८ मे हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जन्मदिवस.

## □ मारुती माने कमिशन !

रविंद्र सरोवर प्रकरणी बसू सरकारने बसवलेले कमिशन नि:पक्षपातीपणाने काम करणार नाही यासाठी दंगलीची चौकशी करण्याकरिता जयप्रकाश नारायण, चिंतामणराव देशमुख, विजयाराजे शिंदे यांचे कमिशन नेमावे अशी मागणी या-प्रकरणी आंदोलन करणाऱ्या मंडळींनी केली असल्याचे आमच्या नजरेस आले आहे. आम्हांला असे वाटते की, चौकशी समितीवरील सदस्य सुचविताना ते केवळ नि:पक्षपाती आहेत की नाहीत एवढेच पाहून चालणार नाही. याचे कारण चौकशी कलकत्त्याला जातीने जाऊन करावयाची आहे व साक्षीसाठी काही गुंडही येण्याची शक्यता आहे. या दृष्टीने कमिशनवर बसूंनी स्त्री का नेमली नाही हे समजण्यासारखे आहे ! कमिशनच्या सदस्यांचा निर्णय बसू सरकारच्या विरुद्ध जाऊ लागला तर सदस्यांना ' घेराव ' पडण्याची शक्यताही दृष्टीआड करता येणार नाही. या दृष्टीने पन्नाससाठ मंडळींच्या कड्यांतून सहिसलामत उडी मारून बाहेर पडणारे व साक्षीस आलेल्या गुंडांना ' बोलते ' करणारे लोकच कमिशनवर असले पाहिजेत. आमच्या दृष्टीने हे कमिशन तीन माणसांचे असावे. हिंदकेसरी मारुती माने, भारतकेसरी चंदगीराम व पराभूत-केसरी सादिक पंजाबी यांचे चौकशी मंडळ नेमले तर काय होईल पाहा. समजा साक्षीला आलेला गुंड खोटे बोलतो आहे असा संशय आला तर चंदगीराम व सादिक पंजाबी नुसते मोठा आळस देऊन बाह्या वर करतील. एव-

ढ्याने भागले नाही तर त्याची मान पंजात धरून त्याला चार दोन वेळा नुसता वरखाली करताच तो बोलू लागेल. तंगड्या धरून उलटा करणे, ढेगेत पाय घालून भुईवर आडवा पाडणे, पाठीवर थाप मारून बसता करणे या अत्यंत साधासुध्या अहिंसक प्रयत्नांनी बहुतेक गुंड खडाखडा बोलू लागतील. यावेळी हिंद केसरी मारुती माने यांना फारसे काम पडू नये ! साक्षी झाल्या की निर्णय बाहेर पडण्यापूर्वी घेराव अपेक्षित आहे. या वेळी मारुती माने यांनी शड्डू मारून चारपाच आवाज काढताच बहुधा घेराव पांगेल. नाहीतर तिन्ही पहेलवान दोन्ही हातांनी घेराव–मंडळींच्या मुंड्या पिरगाळीत लीलया बाहेर येतील याबद्दल आम्हास शंका नाही.

गुंडांना आळा बसेल अशी शरीरयष्टी असणारी माणसेच कमिशनवर हवीत. मनांत आणले तर ज्वलंत गुंडगिरी लीलया करू शकणारी माणसे या देशांतील स्त्रियांच्या बाजूची आहेत असा धाक निर्माण करण्यासाठी असे काही करणे आवश्यक आहे. देशात अहोरात्र नैतिकता, चारित्र्य, हृदयपरिवर्तन यांची भाषा बोलणारी माणसे गुंडांवर नैतिक छाप पाडू शकत नाहीत ! किंवा फक्त नैतिक छापच पाडतात असेही म्हणता येईल ! तेव्हा नाइलाजाने आम्हाला श्री. जयप्रकाश आदी नावांना विरोध करावा लागतो याचे वाईट वाटते.

महाभारतात हिडींब, बकासूर, जरासंघ इत्यादि गुंडांची प्राथमिक चौकशीदेखील भीमाने केली. अशी ताकदवान माणसे चौकशी समितीवर आली व समाजातील ' सज्जन शक्ती ' गुंडांची उर्वरित चौकशी रस्त्यावर करू लागली तरच गुंडगिरीची छकले उलटसुलट दिशांनी फेकली जातील. धर्माने राज्य चालविणे व प्रजेचे पालन करणे हे सोडून क्षत्रियधर्माशी द्रोह करणाऱ्या युधिष्ठिरांना फक्त भीमच परखडपणे, सांगू शकतो—" दादा तुम्ही षंढ आहांत ! "

## □ अशोकांच्या राजधानीतील सिद्धार्थनगर !

नागपूर येथे गेल्या वर्षीच्या जून महिन्यात जी जातीय दंगल झाली त्या संबंधीच्या खटल्याचा निकाल वृत्तपत्रांतून जाहीर झाला आहे. न्यायमूर्ती निगुडकर यांनी अकरा आरोपींपैकी नऊ इसमांना जाळपोळ व सुरामारी केल्याबद्दल शिक्षा ठोठावल्या आहेत. आम्ही आमच्या स्तंभातून सतत हे सांगत आलो आहोत की, जातीय दंगलीचा निकाल वृत्तपत्रांतून देताना शिक्षा झालेल्या गुंडांचा नामोल्लेख वृत्तपत्रांनी करू नये; कारण यामुळे दंगल कुणी केली हे जनतेला कळते. आमच्या या सूचनेकडे लक्ष न देता सोलापूर बाबा कादरी मशीद खटल्याचा निकाल वृत्तपत्रांनी देतांना अब्दुल रहमान वगैरे नावे दिली. त्याचप्रमाणे मालेगाव बॉम्ब प्रकरणाच्या चौकशीमध्ये गफार, सय्यद अहमद, महंमद अयुब, कासमखान, अजिदुल्ला

इत्यादींना पकडल्याचे वृत्तही दिले. यामुळे देशातील राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रयत्नांत बाधा येते हे कसे ध्यानांत येत नाही ? या सर्वांच्या बाबतीत नुसते काही इसमांना असे म्हटले असते तर नसते चालले ?

या दृष्टीने नागपूरच्या बौद्ध-मुसलमान यांच्यातील दंगलीच्या खटल्याचा निकाल देतांना सर्व वृत्तपत्रांनी जे गुंडांची नावे न देण्याचे धोरण पाळले ते भारतातील सर्व बौद्धांना न्याय देणारे आहे. मात्र नकळत एक चूक झालेली आहे. खटल्याचा निकाल देऊन शेवटी असे म्हटले आहे– " १० जून रोजी रात्री हातात शस्त्रे घेऊन या नऊ गुंडांनी सिद्धार्थनगर वसाहतीवर जो हल्ला केला त्यातून हा खटला निर्माण झाला होता." सगळ्या संयमावर या एका वाक्याने पाणी पडले आहे. सिद्धार्थनगरमध्ये बौद्धच राहत असणार ! दंगल बौद्ध व मुसलमान यांच्यात झाली या एका वाक्यावरून गुंड म्हणून शिक्षा झालेले 'इसम' कोण होते हे लोकांना कळू शकते. लहानशा चुकीने एकात्मतेला असा तडा जातो ! अरेरे ! या अशोकस्तंभाच्या देशांत सिद्धार्थनगरही सुरक्षित नसावे ना ? राष्ट्रीय एकात्मतेची अशी हानी पुढे होऊ नये म्हणून वृत्तपत्रांनी जातीय दंगल खटल्यांचे निकाल देताना यापुढे अधिक काळजी घेणे आवश्यक नाही काय ?

## □ निजलिंग बोध !

फरिदाबादची गोष्ट आहे. गुजराथी सिंह–मोरारजी देसाई यांच्यावर चंद्रशेखर तुटून पडले. चंद्रशेखरांना कसे आवरावे हे निजलिंगप्पांना सुचत नव्हते. तेवढ्यात गुजराथमधील काँग्रेस कमिटीचे सभासद रमणिकलाल धामी यांनी सांगितले, " हा चंद्रशेखर कसला आलाय यंग टर्क ! तरुण असून टरकतात, म्हणून इतर म्हाताऱ्य-नेतृत्वापेक्षा ही मंडळी स्वतःला निराळी समजतात इतकेच. चंद्रशेखर एका उद्योगापतीचे मित्र आहेत. बिर्लांना बदनाम करण्यासाठी याने पैसे घेतलेले आहेत. कुठल्या कुठल्या काँग्रेस पुढाऱ्यांना कोणा कोणा उद्योगपतींकडून नियमितपणे पैसा मिळतो त्याची यादी मी जाहीर करू काय ?"

प्रसंग किती कठीण होता पाहा ! परंतु निजलिंगप्पांनी यातून चतुराईने वाट काढली. त्यांनी चंद्रशेखरांना खाली बसवले आणि रमणिकलाल धामींना ते म्हणाले– " काँग्रेसजनांनी जाहीर रीतीने एकमेकांची वर्मे काढू नयेत या ठरावाची मी तुम्हांला आठवण देतो ! कुणाचीच वर्मे नसती तर हा ठराव आम्ही केला असता काय ?"

चंद्रशेखर आणि रमणिकलाल या अध्यक्षांच्या खुलाशाने अंतर्मुख झाले. या दोघांना एकीकडे घेऊन निजलिंगप्पा म्हणाले–" मूर्खांनो, बिर्लांनी याला काय दिले

आणि टाटाने त्याला काय दिले याची रे कसली चर्चा करता ? बिर्लांनी ६७–६८ सालात इंदिराजींजवळ आणि माझ्याजवळ– म्हणजे काँग्रेसला–४१ लाख रुपये दिले ! या वर्षी पुंजीपतींनी राजकीय पक्षांना १३० लाख रुपये वाटले. त्यातले १०६ लाख काँग्रेसला मिळाले आणि यांतले ४१ लाख एकट्या बिर्लांचे होते ! फक्त २२ लाख ' स्वतंत्र ' पक्षाला मिळाले. उरलेल्या २ लाखांत–जनसंघ, भारतीय क्रांती दल, द्र. मु. क., अकाली, मुस्लीम लीग–हे सर्व त्यांनी बसविले. कोण कुणाला फुकट १०६ लाख देतोय ? तुम्ही निर्हेतुकपणे कुणाला घोटभर चहा तरी दिला आहे काय ? तुम्ही अजून बच्चे आहात ! तुम्हांला नीट अक्कल येईपर्यंत मला, इंदिराजींना, मोरारजींना, स. का. पाटलांना, यशवंतरावांना काँग्रेस सांभाळली पाहिजे. ज्यांची पोल्ट्री असते त्यांची अंडी पिल्ली असायचीच! शोध लावल्यासारखे चेहरे करून कसले मिरवता !"

**–ग्यानबा**



पुरंदऱ्यांची दौलत

पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये


राजहंस प्रकाशन

३१ मे १९६९

# बालचित्रकार सुहास बहुलकर

अनंत भिडे

नुकत्याच झालेल्या 'महाराष्ट्र' दिनाच्या सुमुहूर्तावर म्हणजेच दि. १ मे रोजी पुण्याचे, महाराष्ट्राचे खरे भूषण असलेला चौदा वर्षांचा एक बालचित्रकार कुमार सुहास बहुलकर याने आपला चौथा 'वन् मॅन शो' भारताच्या राजधानीत 'दिल्ली'त फाईन आर्ट गॅलरी, येथे मांडला होता. हे प्रदर्शन १० दिवस खुले होते. त्याचे उद्घाटन शिक्षण खात्याचे राज्यमंत्री श्री. भक्तदर्शन यांच्या हस्ते झाले. कुमार बहुलकर याने अगदी लहान वयापासून विविध चित्रस्पर्धांत प्रवेश करून आजवर अनेक पारितोषिके, पदके, प्रशस्तिपत्रे मिळविली आहेत. परदेशांतही त्याच्या चित्रांनी नाव मिळविले आहे. इतकेच नव्हे तर काही चित्रे तिथे वास्तव्य



दिल्ली प्रदर्शनात मांडलेले एक चित्र

करून आहेत. माध्यमिक शालेय शिक्षणाबरोबर सुरू असणारी त्याची ही कलासाधना पाहून सामान्य मनुष्य अगदी थक्क होऊन जातो.

या त्याच्या चौथ्या प्रदर्शनात पोर्टेट्स, लँडस्केप्स, कॉंपोझिशन्स (रचनाचित्रे) अशा चित्रकला प्रकारांतील निवडक ४० ते ५० कलाकृती त्याने मांडल्या होत्या व त्यासाठी ६० ते ६५ कृती त्याने तयार केल्या होत्या. असे हे चिकाटीचे, परिश्रमांचे काम हे त्याच्या १५ वर्षाच्या वयाला न शोभणारे म्हटले तरी चालेल. केवढी जिद्द ! वयाच्या १५ व्या वर्षी दिल्लीसारख्या ठिकाणी (राजधानीत) 'वन् मॅन शो' आणि तोही ४० ते ४५ चित्रांचा मांडण्याचे ठरविणे आणि अमलात आणणे, हे दोन्हीही अतिशय अवघड, तसेच धाडसाचे. पण सुहासने ते धाडस केले. या पूर्वीही अशीच दोन तीन प्रदर्शने पुणे, मुंबई येथे त्याने सादर केली होती. या प्रदर्शनाला सुयश चिंतणारी मा. राष्ट्रपती, पंतप्रधान, उपपंतप्रधान, गृहमंत्री अशा अनेक थोर व्यक्तींची पत्रं सुहासला आली आहेत. महाराष्ट्राचा चित्रकार राजधानीत चमकला. त्याच्या कलेचे अमाप कौतुक झाले. दिल्लीकरांनी वाहवा केली. सुहासची पाठ थोपटली. आणि म्हणूनच नजीकच्या काळात एक ख्यातनाम चित्रकार म्हणून या सुहासची ओळख सर्वांना होईल, असा विश्वास वाटतो. C

## रंगभूमी

# आधे-अधुरे

वसु भगत

माणसाचे मन मोठे चमत्कारिक असते.

त्याला किती गाठी पडलेल्या असतात...किती निरगाठी असतात. अनंत कपारी आणि कंगोरे असतात.

या साऱ्याच गाठी आपल्याला दिसतात, जाणवतात, असे नाही.

किंबहुना त्या क्वचितच दिसत असतात. जाणवत असतात.

एखादी गाठ खूपच करकचून आवळली गेली, की ती दुखऱ्या फोडासारखी ठणकू लागते. त्या वेदनेने माणूस तगमगू लागतो, तडफडू लागतो.

मग माणूस ही गाठ सोडवायला जातो, तेव्हा होते काय की, ती गाठ तर सुटता सुटत नाही; उलट आणखी हजारो गाठी पडत जातात आणि नुसता आक्रांत करण्यापलीकडे माणसाला काहीच करता येत नाही.

हिंदीतील विख्यात नाटककार श्री. मोहन राकेश यांचे 'आधे अधुरे' हे नवीन नाटक अशाच एका मनाच्या गाठीचे आणि तिने निर्माण केलेल्या आक्रांताचे नाटक आहे. या नाटकाचे काही प्रयोग नुकतेच थिएटर युनिटने मुंबईच्या रंगभूमीवर सादर केले.

व्यावहारिक तर्कशास्त्राच्या हिशेबाने अगदी तर्कशुद्ध वाटणाऱ्या एका भावनेपोटी असा काही गुंतवळा निर्माण होतो की तो काही केल्या सुटता सुटत नाही. उलट, तो अधिकाधिक वाढतच जातो. इतका वाढत जातो की, सारे आयुष्यच त्यात गुरफटून जाते.

मग, या गुंतवळयातून बाहेर पडणे शक्यच होत नाही.

हा गुंतवळा जीवाला काचू लागतो. माणसे त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करू

लागतात. पण, ते जेवढा जास्त प्रयत्न करू लागतात तेवढा गुंतवळा आणखी आणखी गुंतू लागतो. गाठी–निरगाठी पडतच राहतात.

हे असे का होते ?

हे असे होते याचे कारण अगदी उघड आहे. माणूस हा मुळात अत्यंत स्वार्थी आहे, अत्यंत आत्मकेंद्रित आहे आणि याच्याच जोडीला अत्यंत अहंकारीही आहे.

या स्वार्थाचे, आत्मकेंद्रिततेचे आणि या अहंकारीपणाचे असे काही प्रबळ, चिवट आणि अतूट वेढे त्याच्याभोवती पडलेले असतात की, स्वतःपलीकडचे जग त्याला दिसतच नाही.

किंबहुना स्वतःपलीकडचे जे जग तो पाहतो, त्या जगाने आपल्या अहंकारापुढे हीन-दीन होऊन पडावे, असे त्याला वाटत असते.

कारण, विलक्षण आत्मकेंद्रिततेमुळे आणि अहंकारामुळे स्वतःविषयी, स्वतःच्या कर्तृत्वाविषयी, स्वतःच्या पूर्णत्वाविषयी त्याचे तेवढेच चमत्कारिक समज झालेले असतात.

व्यावहारिक तर्कशास्त्राच्या हिशेबात हे समज गैर असतातच असे नाही; किंबहुना अनेकदा ते गैर नसतातही. पण, माणसा-माणसांतील मानवी आणि भावनात्मक संबंधांचे जे तर्कशास्त्र असते त्या तर्कशास्त्राच्या हिशेबात ते केवळ गैरच ठरत नाहीत तर विपरीतही ठरतात.

पण, हे मान्य करायला माणूस तयार नसतो.

कारण, तो आपल्यापुरतेच पाहत असतो. आपल्यातच गुरफटून गेलेला असतो.

' आधे अधुरे 'मधली सावित्रीही अशीच आपल्यापुरतीच पाहत होती. आपल्यातच गुरफटून गेली होती.

सावित्रीच काय; पण, तिचा नवरा, तिची मुले, तिचे मित्र...कुणी कुणीच याला अपवाद नव्हते.

सारे स्वतःतच गुंतले होते. आपल्या पलीकडचे जग त्यांना कळत नव्हते. आपल्या-भोवती वावरणारी इतर माणसे त्यांना कळत नव्हती. उमगत नव्हती.

साराच गुंतवळा झाला होता आणि प्रत्येकजण त्यातून सुटण्याचा प्रयत्न करीत होता ...एकाकी प्रयत्न...निष्फळ प्रयत्न...वांझोटे प्रयत्न...

खरे म्हणजे, कुणाच्याच प्रयत्नांना दिशा नव्हती. मार्ग नव्हता. गती नव्हती.

कारण, प्रत्येकजण फक्त स्वतःचाच विचार करीत होता. स्वतःपुरतेच पहात होता. प्रत्येकजण फक्त आपल्या स्वतःच्याचभोवती गरगरा फिरत होता...आणि पुन्हा-पुन्हा जिथे होता तिथेच येऊन पोहोचत होता.

त्यामुळे, गुंतवळा सुटत नव्हता. उलट अधिकाधिक वाढतच होता.

सावित्रीचा नवरा महेंद्रनाथ निष्क्रिय झाला होता. तो केवळ निष्क्रियच नव्हता तर, कणाहीनही होता. त्याचा आत्मविश्वास हरवला होता. त्यामुळे, आपल्या निष्क्रियते-

वर, कर्तृत्वशून्यतेवर कुढण्याव्यतिरिक्त, चिडण्याव्यतिरिक्त तो काहीच करू शकत नव्हता.

सावित्रीच्या मोठ्या मुलीने-बिन्नीने–एक दिवस घरातून पळून जाऊन आपल्यापुरता मार्ग शोधून काढला होता. ती सावित्रीच्या एका मित्राबरोबरच पळून गेली होती. त्याच्याशी तिने लग्न केले होते. पण तरीही ती त्या घरातील गुंतवळ्याचे पाश झुगारून देऊ शकली नव्हती. ती होती तिथेच होती. होती तशीच होती...गोंधळ-लेली...हरवलेली...रिक्त...हाती काहीच न लागलेली...

सावित्रीची धाकटी मुलगी किन्नी. ती अजून बाल्य आणि यौवनाच्या सीमारेषेवरच कुठेतरी वावरत होती. या वयात हवा असलेला आधार, माया तिला लाभत नव्हती. त्यामुळे, ती स्त्री-पुरुषांच्या शारीरिक संबंधांविषयीची माहिती मिळवण्यात आपले मन गुंतून ठेवीत होती.

आणि स्वत: सावित्री...?

ती तर मूर्तिमंत रिक्तताच होती. मूर्तिमंत स्वार्थ आणि आत्मकेंद्रितताच होती. तिला वाटत होते की, आपण नोकरी करून प्रपंच सांभाळतो आहो, यात काहीतरी भव्य, दिव्य, अमाप, महान कर्तुत्व गाजवत आहोत. आपल्याभोवती असलेली सारी माणसे कर्तृत्वहीन आहेत. स्वार्थी आहेत. निखट्टू आहेत. कर्तृत्ववान आहोत ते फक्त आपणच. स्वार्थत्याग करतो आहोत तो फक्त आपणच. आपण काहीतरी पूर्ण आहोत. कुटुंबातल्या या साऱ्या स्वार्थी, आपमतलबी, षंढ माणसांत तिला आधार सापडत नव्हता. तिचा अहंकार तिला तो सापडू देत नव्हता. म्हणून ती आधार शोधायला आपल्या मित्रांकडे जात होती. तिथेही तिचा स्वार्थ आणि आत्मकेंद्रित-पणा फणा काढून उभा राहिला होता. तिला तिच्या मित्रांत आधार शोधायचा होता तो केवळ ते महेंद्रनाथ नव्हते म्हणून.

आणि तिचे मित्र ?...ते तरी कुठे पूर्ण होते. तेही तेवढेच स्वार्थी होते.

याचा परिणाम ?याचा परिणाम एवढाच झाला की, सावित्री रिक्तच राहिली. एकाकीच राहिली.

तरीही ते तिला उमगत नव्हते. उमगलेच नाही. व्यवहारी तर्कशास्त्राच्या हिशेबात बसणारे स्वत:विषयीचे समज तिला काही उमगूच देत नव्हते. त्या समजांवर पोसला गेलेला अहंकार तिला समग्र ग्रासून टाकत होता. आपल्या कर्तृत्वाच्या तेजापुढे साऱ्यांनी हीनदीन होऊन पडावे, अशी तिची मनीषा होती.

पण, ते सारे घरच, त्यातल्या साऱ्या माणसांसह, त्यातल्या साऱ्या भावनांसह, त्यातल्या साऱ्या संबंधांसह रिक्ततेत, वैफल्यात आणि निष्क्रियतेत एवढे बुडून गेले होते की, हीनदीन होण्याइतकेही चैतन्य त्याच्यात उरले नव्हते.

त्या घरात वावरणाऱ्या माणसांच्या मनात अभेद्य आणि अनुल्लंघनीय अशा भिंती निर्माण झाल्या होत्या. त्या भिंतींनी त्या घराला एका कारागृहाचे उग्र स्वरूप

प्राप्त करून दिले होते. या कारागृहात ती माणसे आतल्या आत घुसमटत होती. गुदमरत होती. तगमगत आणि तडफडत होती. जळत, पिचत आणि धुमसत होती. हे धुमसणे, खरे म्हणजे, एका अर्थाने बंडखोरी होती. त्या कोंडीतून, त्या कारागृहातून पलीकडे जाऊन आपल्या फुफ्फुसात मोकळा श्वास भरून घेण्यासाठी चाललेली बंडखोरी. पण, ही बंडखोरी वांझोटी होती. निष्क्रिय आणि फलितशून्य होती. त्यामुळे, ती एका उदग्र विकृतीचे रूप घेऊन उकळत तेवढी होती. काचपात्रात उकळणाऱ्या पाण्यासारखी.

याची परिणती, याची अखेर, याचा शेवट ?...

शेवटी दोनच पर्याय उरत होते. एकतर उकळत्या पाण्याच्या उष्णतेने काचपात्राचा स्फोट होऊन विध्वंस होणार होता किंवा दुसरे म्हणजे, उकळत्या पाण्याने उकळत उकळत अखेर स्वतःच नष्ट व्हायला हवे होते.

पण, इथे काचपात्राचा विध्वंस होणार नव्हता.

इथे फक्त उकळते पाणी असेच उकळत राहणार होते. उकळून उकळून स्वतः संपून जाईपर्यंत.

कारण, काचपात्र तडकून टाकायला जो जोम लागतो, जी ताकद लागते, जी पूर्ण उष्णता लागते ती इथे कुणाच्याच जवळ नव्हती.

साऱ्यांचा जोम, साऱ्यांची ताकद, साऱ्यांची उष्णता फक्त स्वतःला उकळवत ठेवण्याइतपतच होती. अर्धवट... अपुरी...

कारण, ही सारी माणसेच मुळी अर्धी होती. अपूर्ण होती...अपुरी होती...

सारेच ' आधे-अधूरे ' होते.

श्री. मोहन राकेश यांच्या या ' आधे-अधूरे ' नाटकाच्या आशयाची व्याप्ती सकृत्दर्शनी फार मोठी वाटत असली तरी मुळात ती तशी नाही. ती समाजातील एका विशिष्ट स्तरापुरतीच सीमित आहे. हा स्तर नोकरदार आणि सुशिक्षित आहे. त्यातूनही तो दिल्ली, मुंबईसारख्या महानगरातील आहे. या नाटकाला मर्यादा पडतात त्या इथेच. लेखकाच्या अपयशाचे बीज रुजले गेले आहे ते या, त्याने स्वतःवर घालून घेतलेल्या मर्यादेतच !

ज्या विशिष्ट आवेगाने आणि आवेशाने हे नाटक विस्तारत जाते, पुढे सरकत जाते तो आवेग आणि आवेश, या विशिष्ट समाजस्तराची जी ठेवण आहे तिच्या संदर्भात, उघडउघडच अवास्तव आहे. हे नाटक जितके ' लाऊड ' झाले आहे... क्वचित अगदी आक्रस्ताळेपणाच्या टोकालासुद्धा ते जाते...तितकी या समाजस्तरातील माणसे कधीच ' लाऊड ' होत नाही. त्यांचे उमाळेही दबलेले असतात. आपल्या सामाजिक दर्जाच्या कल्पनेने ते दडपून टाकले गेलेले असतात.

पण, नाट्यपूर्ण परिणाम साधण्याच्या मोहाने श्री. मोहन राकेश यांनी या वस्तुसत्याकडे पाठ फिरविली आहे.

त्यामुळे, होते काय की हे सारे ओळखीचे असूनही अनोळखीच राहते. माहितीतले असूनही आपले वाटत नाही.

हा लेखकाचा पराभव आहे, असे मी मानतो.

या नाटकात घटना नाहीत. त्या आधीच घडून गेल्या आहेत. इथे आहेत ते फक्त त्या घटनांचे परिणाम. त्या परिणामांतून निर्माण झालेले मनोद्वंद्व !

या मनोद्वंद्वांचा आविष्कार करणारे, त्यांचा विस्तार करणारे प्रसंग या नाटकांत यायला हवे होते. पहिल्याच अंकाच्या सुरवातीला तसे काही सुरेख प्रसंग आलेले आहेत. ऑफिसातून दमून आलेल्या सावित्रीला दारात पाय टाकल्याबरोबर घरात अस्ताव्यस्त पसरलेला पसारा दिसतो. त्यातच कपभर चहासाठी महेंद्रनाथाने टेबलावर आख्खा ट्रेच मांडून ठेवलेला समोर दिसतो. आणि दमलेल्या सावित्रीचा भडका उडतो. या एका साध्या प्रसंगातूनच त्या घराचे स्वरूप, त्यातील माणसांचे परस्परसंबंध व्यक्त होतात. सावित्री आणि तिचा नवरा महेंद्रनाथ यांच्यांतील गुंता झालेले संबंध व्यक्त करणारा असाच एक प्रभावी प्रसंग याच पहिल्या अंकात आहे. महेंद्रनाथाला बाजारातून सामान आणण्यासाठी दिलेल्या पैशांचा तो तिला हिशेब देतो. आणि फक्त वृत्तपत्र विकत घेण्यापुरतेच पैसे स्वत:साठी खर्च केल्याचे सांगतो. त्या एकाच प्रसंगातून सावित्रीचे व्यक्तित्व जसे स्पष्ट होते तसाच महेंद्रनाथाचा निष्क्रियपणा, नाकर्तेपणा अणि त्याची अगतिकताही प्रभावीपणे व्यक्त होते.

पण, या प्रभावीपणाला बाध येतो तो संवादाने. संवाद एवढे आवेशपूर्ण, उग्र आणि ‘ लाऊड ’ असतात की, त्यांच्या प्रपाती सामर्थ्यापुढे प्रसंग क्षीण वाटू लागतात. संवादांत हे नाटक हरवून जाते.

श्री. मोहन राकेश यांचे दुसरे अपयश म्हणजे त्यांची पात्रे. या पात्रांनी लेखकाला चक्क फसविले आहे. एक सावित्री आणि दुसरा महेंद्रनाथ हे दोघे वगळले तर बाकी सारी पात्रे ही एकसुरी आहेत. त्यांचा मुलगा, मुली, सावित्रीचा बॉस सिंघानिया हे सारेच कसे ‘ सेक्स पर्व्हर्स्ड झालेत ? घरात निर्माण झालेल्या कॅयॉसचा प्रत्येकावर...निदान त्या घरात राहणाऱ्या प्रत्येकावर...वेगवेगळा परिणाम व्हायला हवा होता. पण, इथे तसे होत नाही. इथे सारेचजण भडाभडा आवेगाने बोलत राहतात. सारेच उद्धटपणे वागतात. सारेच तुच्छतावादी होतात. ही पात्रे म्हणजे एकाच पात्राची वेगवेगळया लकबी दिल्या गेलेले अवतार आहेत.

कदाचित श्री. मोहन राकेश यांनी हे मुद्दामच केले असेल. कारण, त्यांनी नाटकाला जोडलेल्या उपोद्‌घातात असे प्रतिपादन केले आहे की, सारी माणसे ही इथून तिथून सारखी असतात. एकच असतात. फक्त त्यांनी वेगवेगळे मुखवटे धारण केलेले असतात. कधी महेंद्रनाथाचा, कधी सिंघानियाचा, कधी जगमोहना। तर, कधी जुनेजाचा !

श्री. सत्यदेव दुबे यांनी हे नाटक मोठ्या समर्थपणे दिग्दर्शित केले आहे. लेखकाच्या

नाटयाकृतीतले गुण जसे त्यांनी कटाक्षाने जपले तसेच दोषही जपले आहेत. नाटकातले आवेशपूर्ण, ' लाऊड ' संवाद श्री. दुबेंनी तेवढेच आवेशपूर्ण आणि ' लाऊड ' ठेवले आहेत. पण, पात्रांची रचना, हालचाली, नेपथ्य, प्रकाश या साऱ्यांच्या सुबक बंदिस्तीबरोबरच काही बारकावेही कौशल्याने साधले आहेत. महेंद्रनाथ रंगमंचावर नसतानाही त्याची खुर्ची त्याचे आस्तित्व सारखे जाणवून देत राहते. त्याच्या अनुपस्थितीत, त्याच्याविषयी संतापून अनुदार बोलणारी सावित्री मध्येच क्षणभर त्या खुर्चीकडे पाहत राहते. जणू ती खुर्ची म्हणजे महेंद्रनाथच आहे. आणि ती त्याला जाब विचारते आहे, असे अनेक बारकावे या नाटकात श्री. सत्यदेव दुबे यांनी विखरून ठेवले आहेत.

अभिनयाच्या बाबतीत मात्र हा नाटयप्रयोग खरोखरच दृष्ट लागावा इतका देखणा होता. प्रत्येक कलावंताने आपली आपली भूमिका, तिच्यातील साऱ्या गुणदोषांसह, विलक्षण अस्सल स्वरूपात उभी केली. या नाटकाच्या यशात कलावंताचा वाटा खरोखरच सिंहाचा वाटा आहे. ज्योत्सना कार्येकर (पूर्वाश्रमीच्या या ललिता कामेरकर) यांनी सावित्री ज्या समर्थपणे उभी केली त्याला शब्दांत बांधणे कठीण आहे. दीपा बसरूरची बिन्नी, भक्ती बर्वेची किन्नी, अमोल पालेकरचा मोठा मुलगा. . . साऱ्यांचीच जणू जुगलबंदी चालली होती. महेंद्रनाथ, जगमोहन, सिंघानिया आणि जुनेजा या चार भूमिका अमरीश पुरींनी केल्या. त्यांनी या साऱ्या भूमिका. . . चांगल्या केल्या. त्यातही त्यांचा महेंद्रनाथ अधिक वास्तव आणि जिवंत होता.

एकाच माणसाने चार भूमिका करण्याचे कारण ?

कारण एकच. सारी माणसे इथून तिथून सारखीच असतात. एकच असतात.

पण, हे जर मांडायचे होते तर उरलेल्या भूमिका तरी इतरांना कशाला दिल्या ? त्याही त्यांनी स्वत:च का नाही केल्या ? एकपात्री प्रयोगाचे श्रेय तरी मिळाले असते थियटर युनिटला.

हे सारे एवढे तपशीलाने लिहायचे कारण असे की, श्री. मोहन राकेश यांचे हे नाटक प्रायोगिक नाटक आहे. निदान आशयाच्या दृष्टीने तरी ! म्हणून त्याचे स्वरूप प्रायोगिकच राहायला हवे. त्यात व्यावसायिक तडजोडी स्वीकारण्याचे किंवा करण्याचे काहीच कारण नाही.

थिएटर युनिट ही एक अत्यंत गुणी कलावंतांची संस्था आहे. तिला चांगली, प्रायोगिक आणि समर्थ नाटके मिळाली तर ती हिंदी रंगभूमीवर खूप काही घडवू शकेल. यात शंका नाही. ○

चंद्रशेखर मराठे

# भारत कृषक समाजाचे कार्य

मुंबई येथे सध्या पाचवे राष्ट्रीय शेती प्रदर्शन भरले आहे. निरनिराळी राज्य सरकारे, शेतीला साहाय्यकारी ठरणाऱ्या मालाचे उत्पादन करणारे कारखाने वगैरेंनी तेथील एकूण ६२ स्टॉलसमध्ये आपापल्या मालाचे नमुने ठेवले आहेत. हे प्रदर्शन 'भारत कृषक समाजा'च्या विद्यमाने भरले आहे.

श्रीनगर येथे १९५४ मध्ये भरलेल्या राज्य–शेतकी मंत्र्यांच्या बैठकीत 'भारत कृषक समाजा'ची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याच वर्षी समाजाची स्थापना झाली. समाजाचे स्वरूप बिगर राजकीय असून शेतकऱ्यांच्या हितसंबंधांची सर्वतोपरी जोपासना करणे हे या समाजाचे ध्येय आहे.

'भारत कृषक समाजा'ने आतापर्यंत १२ अखिल भारतीय शेतकरी मेळावे आयोजित केले आहेत. अ. भा. शेतकरी मंडळाच्या २० बैठकीही आयोजित केल्या आहेत. शेतीप्रश्नाचा अभ्यास करणे व आधुनिक शेतीतंत्राचा प्रसार करणे याव्यतिरिक्त समाजाने शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी अनेक सेवा–सुविधा सुरू केल्या आहेत.

'फार्मर्स को–ऑपरेटिव्ह बँक ऑफ इंडिया, लि.' या संस्थेची स्थापना समाजाने केली. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो; तसेच शेतमालाच्या विक्रीव्यवस्थेसाठी समाजाने 'नॅशनल ॲग्रिकल्चरल को–ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन' या संस्थेची स्थापना केली आहे. आंतरराष्ट्रीय समाजाने आफ्रो–आशियायी देशांतील ग्रामीण जनतेच्या हितसंवर्धनासाठी 'आफ्रो–एशियन रूरल रिकन्स्ट्रक्शन ऑर्गनायझेशन' या संस्थेची स्थापना केली असून आशियातील व आफ्रिकेतील अनेक देशांची सरकारे व तेथील शेतीसंघटना या संस्थेच्या सभासद आहेत.

१९५९–६० मध्ये समाजाने जागतिक शेतकी प्रदर्शनाचे संयोजन केले होते.

या प्रदर्शनास ३५ लाख लोकांनी भेट दिली. या प्रदर्शनाच्या अपूर्व यशामुळे राष्ट्रीय पातळीवर देशाच्या निरनिराळ्या भागांत अशी प्रदर्शने घेण्याची पद्धत सुरू झाली. आतापर्यंत समाजाने ५ राष्ट्रीय प्रदर्शने व ३ राज्यप्रदर्शने आयोजित केली आहेत. शेतीच्या विविध प्रश्नांवर समाजाने भरवलेल्या विविध परिसंवादांतील शिफारशी सरकारने अमलात आणल्या आहेत.

ग्रामीण प्रश्नांची उकल सुसूत्र पद्धतीने करण्याचा प्रयत्न म्हणून समाजाने शेती व कुटुंबनियोजन यांसंबंधी प्रायोगिक प्रकल्प सुरू केले आहेत. समाजाच्या केंद्रीय कार्यालयात एक खास संशोधन विभाग सुरू करण्यात येत आहे. शेतीच्या विविध प्रश्नांबरोबरच हा विभाग संसद व राज्यविधान सभेपुढे येणाऱ्या शेतीविषयक धोरणांचा व कायदेकानूंचा काळजीपूर्वक अभ्यास करील व त्यांचे मर्म शेतकऱ्यांस समजावून सांगेल. सरकारी साहाय्य योजनांची माहिती या विभागाद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल. शिवाय शेतीतील नवनवीन तंत्रेही त्यांना समजतील.

भारताच्या सर्व प्रमुख केंद्रांत शेतकरी शिक्षण केंद्रे स्थापन करण्याची समाजाची योजना असून तीबाबत पावले टाकली जात आहेत. त्याखेरीज मातीची तपासणी करण्याच्या सोयी व शेतीमाहिती केंद्रेही या शिक्षण केंद्रांत उपलब्ध करण्यात येतील.

भारताच्या सर्व प्रमुख केंद्रांत शेतकऱ्यांस आवश्यक अशा सोयी—सुविधा, ट्रॅक्टर्स, इतर शेतीयंत्रसामग्री, खते व जंतुनाशके उपलब्ध करण्यासाठी कस्टम ॲग्रिकल्चरल सेंटर्स स्थापन करण्यात येत आहेत. या केंद्रांमधून तेथील शेतकऱ्यांना आपली शेतीविषयक साधने एकत्रितरीत्या वापरता येतील व नवीन साधने घेण्यासाठी कर्जाची सोय करण्यात येईल.

महाराष्ट्रामधील जळगाव जिल्ह्यात रोझोडे, अत्रावळ व चांगदेव या तीन गावांत समाजामार्फत 'फार्मर्स ॲण्ड वर्ल्ड अफेअर्स इन्कॉर्पोरेटेड' या अमेरिकन संस्थेच्या सहकार्याने नुकतीच एक पाहणी करण्यात आली. या पाहणीचा उद्देश ग्रामीण जनतेचा नवीन शेतीतंत्र व कुटुंबनियोजन तंत्र यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण अजमावणे हा होता. पाहणीत समाविष्ट असलेल्या कुटुंबांपैकी केवळ १५ टक्के कुटुंबांनी प्रभावी कुटुंबनियोजन तंत्राचा अवलंब केलेला आढळून आला. बाकीच्यांना याची काही माहिती नव्हती वा त्यांना याबाबत संकोच वाटत होता. शेतीतंत्राबाबत असे आढळून आले की, सुशिक्षित शेतकरी आधुनिक शेतीतंत्राचा लवकर अवलंब करतात. कुटुंबनियोजनतंत्र व आधुनिक शेतीतंत्र या दोहोंकडे पाहण्याचा दृष्टिकोण अज्ञान व गतानुगतित्व यांनी दूषित झालेला आढळला.

जळगाव पाहणीप्रमाणेच भारतात अन्यत्र तीन ठिकाणी अशीच पाहणी करण्यात येईल. या पाहणीच्या निष्कर्षांमधून ग्रामीण जनतेचा दृष्टिकोण बदलण्याची काही वाट सापडू शकेल, अशी या समाजास आशा वाटते. ○

# कुबड्या

## राम फाटक

बस थांबल्याबरोबर मी खाली उतरलो व मागे वळून पाहिले. तो उतरत होता. चेहरा हसरा होता, डोळे विलक्षण बोलके होते. बसमधले प्रवासी सहानुभूतीने त्याच्याकडे पाहत होते. स्टॉपवर चढणारे नव्हतेच. मी एका हाताने त्याला आधार दिला. एका कुबडीच्या आधारावर तो रस्त्यावर आला. कंडक्टरने आतूनच दुसरी कुबडी लांब केली. मी ती हातात घेतली व त्याच्या काखेत सरकवली. कंडक्टरने आमच्याकडे हसून घंटा वाजवली. रस्त्याच्या कडेला आम्ही दोघेच उभे होतो. येताजाता लोक पाहत होते. पुढे जात होते.


त्याने स्मित करून मला म्हटले, " थॅंक्स. " पांढरे शुभ्र दात चमकले. करडे डोळे भिरभिरत वर पाहत होते. पांढरा शुभ्र मॅनिला व काळी पॅंट, एक पाय पूर्ण, एक गुडघ्यापर्यंत. २०–२२ वर्षांचा तो मुलगा माझ्याकडे पाहत होता. अंगाने चांगला सशक्त होता. अर्ध्या बाहीतून पिळदार गोरेपान हात व त्यावर घड्याळाचा काळा पट्टा उठून दिसत होता. डोक्यावरचे कुरळे केस अस्ताव्यस्तपणे भांग पाडल्यासारखे दिसत होते.

" रस्ता क्रॉस करायचा का ? " मी किंचित वाकून विचारले.

" छे ! छे ! ही काय बिल्डिंग. " त्याने हसून समोर बोट केले. कुबड्यांवर रेलून तो उभा होता. " इथंच राहतो मी वरच्या मजल्यावर. बराय, थॅंक्स अगेन."

मी हसलो. त्याने पॅंटमधून रुमाल काढला व दोन्ही हातांचे तळवे स्वच्छ पुसून कुबडीच्या मुठी गच्च आवळल्या. मी पाठ फिरवून रस्ता क्रॉस करू लागलो. ' ठक्, ठक् ' आवाज मागे येत होता. बहुतेक तो चालला असेल. पलीकडे गेल्यावर मी वळून पाहिले, त्याच्या दंडाला धरून एक स्त्री त्याला पायरीवर चढण्यास मदत करीत होती. बहुधा बहीण असावी !

वास्तविक बसमधून मी फारसा जात नसे, पण गाडी दुरुस्तीला गेली व टॅक्सीचा संप, त्यामुळे बसचा आधार घ्यावा लागला व त्याची गाठ पडली. डॉ. सुरेशकडे माझा एक पेशंट हाताचे हाड मोडल्यामुळे ठेवला होता. त्याला पाहण्यासाठीच मी



आलो होतो. डाव्या हाताच्या गल्लीत शिरून मी हॉस्पिटलचा रस्ता धरला. तो अधू मुलगा मात्र मनात घर करून होता. का कुणास ठाऊक, पण तो पुन्हा भेटावा असे वाटू लागले.

चार दिवसांनी तो पुन्हा माझ्या दृष्टीस पडला. सायन सर्कलजवळची कन्सल्टिंग रूम बंद करून पाच वाजता मी गाडी घेऊन निघालो होतो. सर्कलच्या बसस्टॉपवर क्यूमध्ये तो उभा होता. नकळत मी गाडी हळू केली व कडेला थांबवली. आतूनच त्याला बोटाने खूण केली. क्यूतले सगळे लोक एकमेकांकडे पाहत होते. त्याने मला ओळखले असावे. 'मी का?' असे बोटानेच त्याने खूण करून विचारले. मी मानेनेच 'होय' म्हटले.

तो 'ठक्, ठक्' करीत गाडीच्या खिडकीपाशी आला.

"काय साहेब?" त्याने हळूच विचारले. किंचित बावरल्यासारखा त्याचा चेहरा झाला. मी मागचे दार हात लांब करून उघडले व बसण्याची खूण केली.

"पण." त्याची नजर बोलून गेली.

मी हसून त्याला म्हणालो, "तुझ्या घराकडेच चाललोय. वाटेत सोडतो तुला..."

आढेवेढे न घेता त्याने खांद्याने दरवाजा रेटून धरला व एक कुबडी आत टाकली. दुसरी हाताने धरून त्याने रस्त्याकडे तोंड केले व सीटवर सरकला. कुबडी हातात उभी धरून दरवाजा बंद केला. रांगेतल्या सगळ्यांच्या नजरा आमच्याकडे होत्या. मी गाडी चालू केली, तसे ते माना वळवून गाडी जाईपर्यंत पाहत होते.

"नोकरी करतोस वाटतं?"

"नाही साहेब, बाहुल्या करण्याच्या वर्गात जातो."

"किती दिवस झाले?" काहीतरी विचारायचे म्हणून मी विचारले.

"सहा महिने." तो हात चोळीत म्हणाला.

"साहेब, तुम्ही डॉक्टर आहात काय?" त्याने हळूच प्रश्न केला. बहुतेक त्याने मागच्या सीटवरील मेडिकल जर्नल, बॅग, सॅंपल्स पाहिली असावीत.

"हो, का?" मी किंचित हसून म्हटले. अधून मधून समोरच्या आरशात

पाहत होतो. त्याची नजर आजूबाजूला फिरत होती. मला या गाडीत का घेतले, याचे त्याला कोडे पडले असावे.

" सहजच !"

" नाव काय तुझं ? "

" विभाकर देवकुळे, साहेब !"

" हे बघ ! 'साहेब, साहेब' म्हणू नकोस. नुसतं डॉक्टर म्हणालास तरी चालेल. "

मी आरशात पाहिले, त्याने मान हलवली.

'सिटीलाईट' सिनेमाच्या पुढे गेल्यावर मी गाडी त्याच ठिकाणी थांबवली. त्याने चटकन दार उघडले व एक पाय खाली सोडला. दुसऱ्या पायाऐवजी कुबडी घेतली. दाराला धरून रस्त्यावर उतरला. खाली वाकून त्याने दुसरी कुबडी उचलली व दार बंद करून म्हणाला, " आभारी आहे डॉक्टर." मी हसून मान हलवली व गाडी चालू केली. ती स्त्री त्याला आधार देण्यास आली असावी. मी वळून पाहीपर्यंत गाडी पुढच्या चौकात गेली. मी त्याला लिफ्ट का दिली हे माझे मलाच कळेना. सगळे सहज नकळत घडून गेले होते.

मग ते नेहमीचेच झाले. पुढे पुढे तर तो बसच्या रांगेत उभा न राहता बाजूला उभा राहू लागला. मी पण सवयीने तेथे येत होतो, त्याला घेत होतो, घरी सोडत होतो.

" काय रे, एक विचारू ? " एक दिवस तो आत बसल्यावर मी विचारले.

" विचारा डॉक्टर." पुढच्या सीटवर दोन्ही हातांनी रेलून तो हसत म्हणाला. त्याची भीड बरीच चेपली होती

" विभाकर, तुझा पाय... अपघातात गेला काय ? " मी विचारले.

जुन्या आठवणीने त्याचा चेहरा उतरल्यासारखा दिसला. पण माझी उत्सुकता ताणली गेली होती. त्या विषयावर तो कधीच बोलला नव्हता, विषय निघालाच तर तो हेतुपूर्वक टाळत होता. अगदी अचानक नकळत हा प्रश्न माझ्या तोंडातून बाहेर पडला होता.

" हं ! " तो एकटक समोरच्या रस्त्याकडे पाहत उद्‌गारला–" मी पाय गमावला, भाऊजी कायमचे गेले. "

" म्हणजे ? " मी किंचित मागे वळून विचारले.

" माझ्या मावशीचे यजमान आणि मी कारने पुण्यास चाललो असताना घडलं सारं." किंचित हसून तो म्हणाला. " मावशी बरोबर नव्हती म्हणून बरं. नाहीतर मी उघडाच पडलो असतो ! "

" म्हणजे मावशी आहे तुला ? " मी विचारले.

" हो. तिच्याकडेच राहतो मी. आई-वडील लहानपणीच वारले. मावशी नोकरी

करते. २००–२५० मिळतात. शिवाय काका–मावशीचे दीर–दरमहा पाठवतात थोडे." तो एकदम बोलून गेला. आपण फार बोलून गेलो हे लक्षात आल्यावर तो एकदम खजील झाला.

मी काहीच बोललो नाही. खोदादाद सर्कलवर गाडी वळवून मी रस्त्यावरचा दिवा हिरवा होण्याची वाट पाहत होतो.

गाडी पुन्हा चालू झाल्यावर तो हळूच म्हणाला, "डॉक्टर! एकदा घरी यानं आमच्या, मावशी रोज विचारते तुझे डॉक्टर केव्हा येणार म्हणून."

"येईन केव्हातरी. त्यात काय मोठं?" मी हसून त्याला उत्तर दिले. पण खरेच मी जाणार होतो का? केवळ उपचार म्हणून मी तसे बोलून गेलो इतकेच.

"डॉक्टर." त्याने हलक्या आवाजात हाक मारली. मी रस्त्यावरची नजर काढून त्याच्याकडे वळलो.

"काय रे?" मी विचारले.

"हे घ्या!" त्याने माझ्यापुढे दोन छोटया बाहुल्या धरल्या. मी त्या डाव्या हातात धरल्या.

"गाडीत ठेवा एक व दुसरी टेबलावर तुमच्या रूममध्ये. छान माना डोलावतात, कंबर हलवतात, कशा आहेत? मी स्वतः बनवल्या." एका दमात तो बोलून गेला. मी काय उत्तर देतो हे ऐकण्यासाठी त्याने मान थोडी तिरपी केली.

मी दोन्ही बाहुल्या समोर ठेवल्या.

"सुरेख आहेत हं! बरीच कला आहे की तुझ्या हातात."

"हं! माणसाला काही कमी असलं की, एक जास्त असतं. आंधळ्याला श्रवणेंद्रियं तीक्ष्ण असतात, मुक्याची बुद्धी तीक्ष्ण असते तसंच हे!" त्याने नजर कुबडयांवरून पायांकडे वळवली. तो बराच गंभीर बोलत होता. मी नुसते 'हं हं' करत होतो.

"डॉक्टर, माणसानं अपंग जीवन जगूच नये. खोटी सहानुभूती, प्रेम यांचा वीट येतो त्याला. दोन पाय असलेली माणसं प्रेम, लाचारी, मान, प्रतिष्ठा, पैसा या कुबडया घेऊन चालत असतात, पण त्या अदृश्य असतात हे फार बरं. पैशासाठी तर..."

मी मान वळवून म्हटलं, "विभाकर, काय झालंय काय तुला? आज फार गंभीर बोलतोस?"

"कुठं तरी बोलावंसं वाटतं डॉक्टर, मनातलं ओकावंसं वाटतं आणि...आणि तुमच्याशिवाय मी ते कोणाजवळ बोलू? मावशी तर..."

बोलणे तिथेच तुटले! तो समोर बोट करून म्हणाला, "ती बघा मावशी." त्या खांबाजवळ ती उभी होती. बहुतेक आज त्याला उतरवून घेण्यास पुढे आली असेल. कदाचित मी कोण आहे, हे पाहण्याचीही एक चोरटी इच्छा असेल.

मी तिच्याजवळ गाडी उभी केली. खिडकीतूनच तिने हसून मला नमस्कार केला. मी उलट नमस्कार केला. ही मावशी ! माझ्या कल्पनेतील मावशी अगदी निराळी होती. पांढरेशुभ्र पातळ, लाल स्लीव्हलेस ब्लाऊज, कुरळे, आखूड केस, दोन बटा चेहऱ्यावर आलेल्या. काळे कुंकू व डोळ्याला गॉगल. गोऱ्या रंगावर लिपस्टिकचा लाल रंग एकदम भडक दिसत होता. डोळ्यांवरचा गॉगल काढून ती म्हणाली, " तुमच्या तसदीबद्दल आभार. माझी काळजी दूर झाली त्यामुळं! " मी काहीच बोललो नाही. समोरच्या बाहुल्यांकडे पाहत होतो. तिचेही तिकडे लक्ष गेले.

" डॉक्टर, घरी येणार काय ? " कपाळावरच्या बटा मागे सारत तिने विचारले. तिच्यामागे उभ्या असलेल्या विभाकरकडे डोळ्यांच्या कोपऱ्यांतून मी पाहिले. त्याने चटकन मान वळवली.

" थँक्स ! " मी खोटे हसून बोलू लागलो. " पुन्हा केव्हा तरी निश्चित येईन. आता साडेसहाला ऑपरेशनला जायचंय " मी सरळ थाप मारली. माझे मलाच कसेतरी वाटले.

" नक्की हं. वेळात वेळ काढून केव्हाही या. " गॉगल डोळ्यांवर ठेवत ती म्हणाली. मी गाडी चालू केली. ती दूर गेली व तिने हात वर केला. विभाकर तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होता. त्याचे माझ्याकडे लक्षच नव्हते.

पुष्कळ दिवसांची जुनी ओळख असल्यासारखी ही बाई माझ्याशी बोलत होती. आग्रह करत होती.

गाडीच्या हलण्यामुळे समोरच्या बाहुल्या एकसारख्या डुलत होत्या.

घर मस्त सजवलं होतं. तीन खोल्यांचा ओनरशिप ब्लॉक. तिच्या नवऱ्यानेच घेतला होता. सोफा, रेडिओग्रॅम, फ्रीज्. सर्व सुखसोयी, आधुनिक उपकरणे व्यवस्थित, कलात्मक रीतीने मांडले होते. एका काचेच्या कपाटात विभाकरच्या बाहुल्या होत्या. मावशीची बडबड व विभाकरचा शांतपणा पाहून मला थोडे आश्चर्य वाटले. भिंतीवर निरनिराळे फोटो होते.

" हा दिराचा. दिल्लीला असतात. एका फर्मचे ब्रँच मॅनेजर आहेत. " ती सांगत होती. त्याच्या शेजारीच मावशीचा जोडीने फोटो होता. तिने मान खाली घातली. मी काहीच बोललो नाही.

अर्धा तास कसा गेला ते कळले नाही. विभाकर मात्र अगदी मोजके बोलत होता. कदाचित मावशीपुढे बोलण्यास तो भीत असावा.

पुढे बरेच दिवस विभाकर स्टॉपवर दिसला नाही. घरावरून जाताना माझी नजर सहज वर जात होती. पण तेथेही कोणीच दिसले नाही. एकदा वाटले वर जाऊन यावे. पण पुन्हा विचार बदलला. माझे जाणे कितपत योग्य होते. कोणी ओळखीचे भेटले तर.

एके दिवशी रूम बंद करून ' रूपम 'च्या बाजूने मी चाललो असताना समोर मावशी दिसली. हातात आईस्क्रीमची कांडी होती. दुसरा हात कोणा पुरुषाच्या हातात होता. हसत ती दोघे सिनेमागृहाच्या पायऱ्या चढत होती. कोठेतरी त्याला पाहिल्याचे आठवले. कोण हा ? आणि एकदम आठवले, तिचा दीर दिल्लीला असतो तो. मी चमकलो. डोळ्यांसमोर तिचे भारी किमतीच्या वस्तूंनी भरलेले घर आले. विभाकरला हे माहीत आहे काय ? माझ्याकडे तिचे लक्ष जाणे शक्यच नव्हते. त्यानंतर २-३ वेळा दुसऱ्या कुणाबरोबर तरी हॉटेलात, सिनेमात पाहिले. मी तिच्याकडे जाण्यात चूक केली होती व वेळीच सावरलो होतो.

बऱ्याच दिवसांनी विभाकर तेथे दिसला. " काय रे कुठं होतास ?" मी विचारले.

" इथंच होतो " त्याचा चेहरा बराच उतरला होता. पहिला हसरा चेहरा पाटी पुसल्यासारखा स्वच्छ कोरा होता.

" क्लास बंद केलास ?" मी विचारले.

" नाही. माहीमला जातो आता. " तो म्हणाला. मी काहीच बोललो नाही.

" डॉक्टर..." त्याने हळूच हाक मारली.

" अं ? " मी विचारले.

" मावशीला बरं नाही. आज आठ दिवस झाले. डॉक्टरकडेही जात नाही." तो थंड स्वरांत म्हणाला.

मी चरकलो. स्त्रीरोग चिकित्सक असल्यामुळे अंदाज बांधणे मला शक्य होते.

" तुम्ही बघता तिला ?" त्याने विचारले.

मी सवयीने सहजच ' हो ' म्हणून गेलो. आता एक डॉक्टर या नात्याने मी जाणार होतो. त्यामुळे भीती थोडी कमी झाली.

दार उघडून मी व विभाकर आत गेलो. बॅग टेबलावर ठेवली.

मावशी सोफ्यावर पडून होती. मला पाहताच ती चटकन उभी राहिली व तिने पदर सारखा केला.

"मावशी ! डॉक्टर आलेत." विभाकर कुबड्यांवर रेलून तिच्याकडे पाहत म्हणाला.

चेहऱ्यावर हसू आणत ती म्हणाली, " येऊ देत ना. इथं कोण थोडंच आजारी..."

बोलता बोलता तिने दोन्ही हातांनी डोके गच्च धरले व ती खाली कोसळली. मी पळतच पुढे गेलो. तिच्या खांद्याला धरून मी तिला उभी केली. विभाकर ' ठक, ठक ' करीत माझ्यापुढे आला व त्याने समोरचा दरवाजा उघडला. मी तिला कॉटवर निजवली, तेवढ्यात विभाकर बॅग व कुबडी एका हातात धरून आत आला. मी बॅग घेतली. तिला तपासण्यापूर्वी मी विभाकरकडे पाहिले. तो ' ठक' ठक ' आवाज करीत बाहेर गेला. तिने हळूच डोळे उघडले. मी नाडी, छातीचे ठोके तपासत होतो. पोट तपासण्यासाठी मी हात खाली नेला तेव्हा तिने तो चटकन

पकडला. मी चमकून तिच्याकडे पाहिले. डोळे पाण्याने भरले होते. दुसऱ्या हाताने तोंडातला हुंदका तिने दाबून धरला होता. माझी शंका खरी ठरली. वासनेने पापाचा आधार घेतला होता. मी झोपेचे इंजेक्शन देऊन बाहेर आलो व दार मागे बंद करून घेतले.

स्त्री ज्या सुखासाठी घडपडत असते, ते सुख दुःखाचा आधार घेऊन वाढत होते. मी बॅग समोरच्या टेबलावर ठेवली. विभाकर कोचावर बसला होता. मान खाली गेली होती. इतके दिवस तोंड चुकवण्याचे कारण मला कळले होते. भिंतीच्या आधाराने कुबडचा उभ्या होत्या. त्यांनाही दुसऱ्याचा आधार घ्यावा लागत होता. एका पायाने जीवन जिद्दीने जगवण्याचा विभाकरचा प्रयत्न होता. आणि आत पैशाच्या उबेसाठी दोन पायांवर दुःख सहन करणारी स्त्री होती. तेही जगण्यासाठी, पण दोन्हींत फरक होता. एक लांबच्या मार्गाने चालला होता, एकाने जवळचा मार्ग पत्करला होता. दोघांनी मात्र कुबडयांचाच आधार घेतला होता.

चोरटचा नजरेने त्याने माझ्याकडे पाहिले.

" मला वाटतं विभाकर..."

त्याने वाक्य तोडले.

" मला माहीत आहे डॉक्टर, पुढं काय वाढून ठेवलंय ते! ...आणि...आणि त्यासाठीच मला तुमचा आधार हवाय." तो म्हणाला.

मी चमकलो. मित्रत्वाचा फायदा घेण्याचा प्रयत्न त्याने केला, त्यात विशेष काही नव्हते. नाइलाजच होता. पण मला माझा विचार करणे भाग होते. अशी केस मी कधीच हाताळली नव्हती. त्या पापाचा कधीच स्पर्श झाला नव्हता. होणार नव्हता. शिवाय सिस्टर-नर्स यांच्या नजरा टाळता येणे शक्य नव्हते. मी स्वतःहून ॲडमिट केलेली केस म्हणजे संशयाला बी लावण्यासारखे होते ते. हे जमणे शक्य नव्हते. नकार देणेही जिवावर आले होते. पण स्पष्ट सांगणे भाग होते.

" विभाकर!" मी खालच्या आवाजांत म्हणालो. " मला कोडयात टाकतोस तू." बॅग घेऊन दाराकडे जात मी म्हटले. " माफ कर! पण माझ्याकडून हे काम होणे शक्य नाही."

दार उघडण्यास मी हात घातला तेव्हा विभाकरने मला हाक मारली. मी थांबलो व मागे वळून पाहिले.

विभाकर कुबडचा घेऊन 'ठक, ठक' आवाज करीत समोरच्या कपाटाकडे गेला व त्याने आतून काहीतरी काढले. पाकीट होते ते. कागदाचे ते पाकीट तोंडात धरून दार न लावता तो माझ्यासमोर आला व त्याने पाकीट उघडून माझ्यासमोर धरले. मी चपापलो. १०० च्या नोटा होत्या त्यात. मी त्याच्याकडे रोखून पाहिले.

" पैशाशिवाय कामे होत नाहीत हे मला माहीत आहे, डॉक्टर."

आजचा विभाकर अगदी वेगळा होता.

कोठून आणलेस हे पैसे, असे विचारण्याचा मला अधिकार नव्हता तरी तोंडातून वाक्य बाहेर पडले, " पैशाच्या आधारानं पाप धुण्याचा प्रयत्न करतोस तू ! बोल...बोल कोणाचे पैसे ? तिचे...तिनं मिळवलेले...का कर्ज ?"

" नाही. " त्याच्या डोळ्यांत पाणी तरारले. " नाही ! हे पैसे...हे पैसे...काल ...तारेने आले...दिल्लीहून. "

" हं ! म्हणजे काकांनी पाठवले ? का ?" मी चिडक्या स्वरांत विचारले.

शर्टाच्या बाहीला डोळे पुसून भकास नजरेने त्याने माझ्याकडे पाहिले. नंतर त्याने बंद दाराकडे पाहिले.

मी तोंड उघडून त्याच्याकडे पाहत राहिलो. तोंडातून शब्द बाहेर येईना. अर्थात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते. प्रत्यक्ष मी स्वतः ' रूपम 'जवळ पाहिले होते, पण मी तसे दाखवले नाही.

वळून त्याने कपाट बंद केले. मी विचारले,

" केव्हा आले होते काका ?"

कुबड्या भिंतीला टेकवून तो कोचाचा आधार घेत बसत म्हणाला, " झाले तीन-चार महिने. "

" माफ कर. पैसे घेऊनही मी हे काम करू शकणार नाही. "

बॅग घेऊन मी बाहेर पडलो.

विभाकरचा अंदाज खरा होता. सुख, शारीरिक भूक, पैसा मिळवण्यासाठी माणूस माणुसकीच्या कुबड्या फेकून कृत्रिम कुबड्यांवर चालण्याचा प्रयत्न करतो हेच खरे. मीही त्यांतलाच. प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी मीही माणुसकीची कुबडी फेकून दिली. आणि विभाकर ?...दोन पायांना आधार देण्यासाठी फेकून दिलेल्या कुबड्या घेऊन दीड पायाने मदतीला धावला होता. मला हाक मारत होता. का ? कोणासाठी ?



काकासाठी ? स्वत:साठी ? तिच्यासाठी ? त्याचे उत्तर मला सापडले नव्हते.

पुढे महिनाभर तो दिसलाच नाही. सवयीने मी गॅलरीत पाहत होतो. स्टॉपवर पाहत होतो. पण कोणीच नाही. मला चुटपुट लागून राहिली. काय झाले तिचे ? कुठाय तो ? का जागा सोडली ?

टपालात आलेली पत्रे पाहत असताना एक पाकीट मला मिळाले. मी ते फोडले आणि सवयीप्रमाणे आधी सही पाहिली. ' विभाकर. ' पत्र जेमतेम १०–१२ ओळींचे होते. पत्र वाचताना ते कधी गळून पडले तेच कळले नाही. कोट घालून मी तसाच बाहेर पडलो. गाडी माहीमकडे वळवली.

समोरचा रस्ता मला दिसत नव्हता. विभाकरचे पत्र, त्यातील शब्द-ओळी माझ्या डोळ्यांपुढे नाचत होत्या.

' मावशी दिल्लीला हॉस्पिटलमध्ये वारली...मी एकटा आहे...तुम्ही सर्व दुबळी आहात. मनाने अपंग आहात...मन जगाच्या ताब्यात...दुबळं अपंग मन... सहानुभूतीनं चालणारं...भीतीनं थरारणारं...दुसऱ्याला काय वाटेल याचा विचार करणारं ...स्वत:ला तुम्ही घाबरता...मी जन्मभर निदान लाचार, मावशी परिस्थितीने लाचार होती...तुम्ही प्रतिष्ठेने...शेवटी आपण सगळी कुबड्या घेऊन चालणारी ...दृश्य...अदृश्य...'

विभाकर ! खरोखर मी दुबळा आहे. भित्रा आहे. तेच तुला सांगायचं आहे. मला मी घाबरतो. कुबड्या घेऊन चालण्याचंही त्राण नाही. पण ते आणलं पाहिजे. दुबळा असलो तरी जगायचंय मला. सगळ्यांना...विभाकर...तुलाही.

मी बिल्डिंगमध्ये शिरलो तेव्हा जिन्याच्या पायरीजवळ माणसांचा घोळका होता. मनात अशुभ विचार आला.

" घेरी आली व तोल गेला. माझ्या लक्षात येईपर्यंत तो गडगडत गेला. " कानांवर शब्द आले. मी पुढे झालो. मला पाहून २–४ जण मागे सरकले. काय घडले ते मला समजले होते. इतरांच्या आधाराने त्याला शेजारच्या खोलीत नेले. मी तपासले. बेशुद्ध होता तो. माझ्या गाडीत त्याला उचलून नेत असताना मी जिन्याजवळच्या कुबड्या उचलून त्याच्या मागोमाग चालू लागलो.

डॉ. सुरेश जवळच होता. तेथे त्याला ॲडमिट केले. एक्स-रे वगैरे काढून उद्या कळवतो, असे तो म्हणाला. मी निश्चिंत झालो. मन जरा हलके झाले.

दुसऱ्या दिवशी फोन खणखणला तेव्हा मी चटकन् तो उचलला. डॉ. सुरेशचाच होता.

" हॅलो, सुरेश. "

" डॉक्टर...कालचा पेशंट तुमचा रिलेटिव्ह आहे काय ?"

" अं...हं. का ?" मी मोघमात बोललो.

" आय ॲम सॉरी डॉक्टर ! त्याचा दुसरा पाय... "

माझ्या हातून फोन गळून पडला. टेबलाचा आधार घेऊन मी खाली बसलो. समोरची बाहुली संथ लयीत डुलत होती. ○

# पुस्तके

## मोरू परतुनि आला

## हलकी फुलकी विनोदी कथा

मराठी ललित साहित्यात विनोदी साहित्य संख्येने फार कमी आहे. त्याहीपेक्षा गुणवत्तेने तर ते फारच कमी आहे. गोऱ्या पिढीतील चिं. वि. जोशी यांचा दिलखुलास, अव्याज मनोहर विनोद हे एकच मराठी ललित साहित्यातील विनोदी साहित्याचे भूषण आहे. चिं. वि. जोशी यांच्या विनोदी साहित्याइतका श्रेष्ठ विनोद मराठी साहित्यात अजून निर्माण झालेला नाही, हे विधान कोणाला धाडसाचे वाटत असले तरी त्यामधील कठोर सत्य नाकारता येणार नाही. गडकऱ्यांचा विनोद शब्दांच्या चौकटीबाहेर सहसा गेलेला नाही, तसेच अत्रे यांच्या विनोदाला अतिशयोक्तीची भारी ओढ आहे; इतकेच नव्हे तर अनेक वेळा त्यांचा विनोद चारित्र्यहननाच्या आहुती घेत जातो आणि पु. ल. देशपांडे यांचा विनोद जुन्याच्या अभिमानातून आणि बावळटपणाचा बुरखा घेऊन नव्याची टर उडविण्याच्या प्रवृत्तीतून अनेक वेळा निर्माण होत असल्यामुळे त्याचा दर्जाही निर्व्याजितेच्या पातळीवर नेताना पु. ल. देशपांडेंची दमछाक होताना स्पष्ट दिसते !

ही झाली मराठी विनोदी साहित्यातील ख्यातनामांची कथा. या तिघांनंतर ज्या व्यक्ती विनोदी लेखक म्हणून नजरेसमोर येतात त्यांच्या विनोदनिर्मितीला त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्याच मर्यादा

**वि. शं. पारगावकर**

पडलेल्या दिसतात; त्यांमध्ये विनोदनिर्मितीच्या प्रतिज्ञा पाळून निर्मिती करणारे 'ठणठणपाळ' हे एकच लेखक आहेत. पण त्यांच्याही विनोदाचे विषय ठरलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या विनोदाची कक्षा रुंदावू शकत नाही.

मराठीत विनोदी नाटक लिहिले गेले आहे, तसेच विनोदी लेखही बरेच आहेत; परंतु ललित साहित्याच्या प्रांतात कथा आणि कादंबरीच्या संसारात विनोद आलेला नव्हता. त्यांपैकी कथेच्या प्रांतातील ही उणीव द. मा. मिरासदार यांनी भरून काढली. मराठीतील विनोदी कथा ही प्रामुख्याने मिरासदार यांनीच लिहिलेली आहे; एवढेच नव्हे तर तिच्यात त्यांनी बरेच यशही मिळविलेले आहे. परंतु त्यांच्याही विनोदी कथा प्रामुख्याने ग्रामीण बावळटपणावर, अज्ञानावर, मूर्खपणावर आणि क्वचित बेरकेपणावर आधारलेल्या विनोदावरच बेतलेल्या आहेत. अतिशयोक्ती, व्यक्तित्वातील गबाळेपणा, साध्यासाध्या गोष्टींविषयीचे अज्ञान, गावंढळ शब्दांतच कित्येक वेळा इंग्रजी शब्दांचा वापर : उदा. 'डायव्हरने काही तरी 'मिष्टिक' केली आणि बंद पडलेली मोटर एकदम चालू झाली.' अशांसारख्या साधनसामग्रीवरच मिरासदारांच्या विनोदी कथा उभ्या राहतात. परंतु ही गोष्ट सोडली तर त्यांच्या काही थोड्या कथा निर्व्याज विनोदाच्या पातळीवर निश्चित जातात. मराठीत तरी अजून कथेत मिरासदारांइतका विनोद कोणी आणू शकला नाही.

मराठीमध्ये संपूर्ण विनोदी कादंबरी तर आजवर नव्हतीच. परंतु नुकतीच श्री. अरविंद गजेंद्रगडकर यांनी 'मोरू परतुनि आला' ही विनोदी कादंबरी लिहिली आहे. सदर पुस्तकाच्या मागे (मलपृष्ठावर) लेखकाविषयी आणि कादंबरीविषयी जो मजकूर लिहिलेला आहे त्यात, 'गजेन्द्रगडकरांची ही पहिलीच विनोदी कादंबरी आणि क्वचित्प्रसंगी मराठीतीलही पहिलीच विनोदी कादंबरी !' हे उद्गारवाचक विधान केलेले आहे. मलपृष्ठावरील या निवेदनात स्वतः लेखकही एका वाक्यापुरता गुंतलेला आहे. हे वाक्य म्हणजे, 'मोरूचा मोरावळा झाला आहे.' अर्थात या वाक्यातील आशय आणि त्यामागील काही विनोद असेल तर विनोदही लक्षात येत नाही.

एखाद्या कलाकृतिविषयी तेथेच स्वतः लेखकाने किंवा लेखकाच्या वतीने काही विधाने करण्यामुळे अनेक वेळा जबाबदारी कमी होण्यापेक्षा ती वाढते. तेव्हा अशी विधाने करावयाचीच असली तर ती फार जपून करावीत असे वाटते.

आता वरील विधानांतून किती अर्थ निघतात ते पाहा : १. 'मोरू परतुनि आला' ही एक कादंबरी आहे. २. लेखकाची ही पहिलीच विनोदी कादंबरी आहे आणि ३. क्वचित् प्रसंगी मराठीतीतही (ही) पहिलीच विनोदी कादंबरी !'

प्रस्तुत कादंबरी वाचल्यांवर ही वरील सारी विधाने धाडसाची वाटू लागतात. १३९ पृष्ठांचे हे पुस्तक खुसखुशीत आहे, विनोदीही आहे, परंतु ती कादंबरी आहे

किंवा कसे यांविषयी शंका आहे. हल्ली, म्हणज गेल्या पाच-सात वर्षांत मराठीमध्ये कादंबरीच्या घाटात, निवेदनशैलीत, कथावस्तूंत इतके प्रयोग होत आहेत की, त्यामुळे रूढ अर्थाने ठरलेली कादंबरीची व्याख्या या प्रयोगांतून निर्माण झालेल्या कलाकृतीला अपुरी पडू लागली आहे. त्यामुळे ही कादंबरी नाही असे म्हणणेसुद्धा कदाचित जुनेपणाचे लक्षण ठरू शकेल ! अगदी अलीकड दोन खंडांत प्रसिद्ध झालेली रणजीत देसाई यांची ' श्रीमान योगी ' हीसुद्धा कादंबरी आहे, का चरित्र आहे, का ' चरित कहाणी ' आहे, का या व्यतिरिक्त आणखी काही आहे, या विषयींचे विचार चालूच राहणार आहेत. तसेच श्री. ना. पेंडसे यांची ' लव्हाळी ', पु. शि. रेगे यांची ' अवलोकिता ', मनोहर शहाणे यांची ' देवाचा शब्द ' या कादंबऱ्या आहेत किंवा कसे हे ठरविणे अवघड आहे. त्याचप्रमाणे श्री. गजेंद्रगडकर यांच्या ' मोरू परतुनि आला ' या कादंबरीविषयी आहे.

मोरू नामक एक खेडवळ तरुण शहरात डॉक्टर होण्यासाठी जातो आणि शिक्षणाच्या जगात वेगवेगळे प्रवास करता करता डॉक्टर होण्याऐवजी तो संगीताचा अभ्यास करून परततो. आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे ही घरातील मंडळींची फार मोठी अपेक्षा असते. तसे त्याला डॉक्टर होता आले नाही तरी एका वेगळ्या अर्थाने तो डॉक्टर होतो. प्रेमा या नावाची त्याची प्रेयसी डॉक्टरीण होते आणि तिच्याशी त्याचे लग्न झाल्यामुळे ' मास्तरची बायको जशी मास्तरीणबाई ' तसे ' डॉक्टरिणीचा नवरा डॉक्टर ' या उक्तीप्रमाणे मोरू डॉक्टर होतो.

मोरूच्या जीवनाचा हा प्रवास फक्त चारपाच वर्षांचा आहे. हा सारा प्रवास श्री. गजेंद्रगडकर यांच्या खुसखुशीत, मिस्किल आणि क्वचित् ठिकाणी उपरोधिक शैलीमध्ये चित्रित केला आहे.

मोरू, मोरूचे वडील, त्याची आई आणि आत्याबाई अशी चार स्वभावचित्रे येथे प्रमुख आहेत. मोरूच्या जन्मापासून तो स्वतःची कहाणी सांगतो. ' १५ ऑगस्ट १९४७ ला दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. पहिली म्हणजे भारत स्वतंत्र झाला आणि त्याहून महत्त्वाची दुसरी घटना म्हणजे माझा जन्म झाला, ' अशी या विनोदी आत्मचरित्राची सुरुवात आहे. मग मधुकर, मंदार, अभिजित वगैरे आधुनिक नावे ठेवण्याऐवजी ' मोरू ' हे नाव का ठेवले गेले याचा वृत्तांत सांगताना मी म्हणजे माझा आजोबा कसा होतो हे श्री. गजेंद्रगडकरांनी, आत्याबाईंच्याकरवी फर्मासपणे सांगितले आहे. यामध्येच जुन्या विचारांच्या, रूढीचा पगडा वागवणाऱ्या, तरीही अंतर्यामीचा वेरकीपणा सोडू न शकणाऱ्या आत्याबाईंचे चित्रण त्यांनी चांगले उभे केले आहे. आईची आणि आत्याबाईंची आपसातील छुपी आणि प्रकट वर्तणूक यांतून स्वभावदोषांचे चित्रण होत असतानाच विनोदनिर्मितिदेखील अगदी सहजतेने होते. प्रसंग आणि व्यक्तिचित्रे यांच्यांतून ताण निर्माण करताना, विरोधातून उपरोधातून आणि कित्येकदा तर प्रामाणिकपणातूनही गजेंद्रगडकरांच्या लेखणीतून विनोदनिर्मिती होते. अर्थात हा विनोद क्वचितच आपली स्वतःची चमक दाखवितो. बऱ्याच वेळा हा

विनोद ठराविक साच्यातला आणि ठराविक, रूढ ठसा घेऊनच अवतारताना दिसतो.

हा गजेंद्रगडकर यांच्या विनोदातील दोषच म्हणावा लागेल. त्यामुळे प्रसंग-निर्मितीतून होणारे व्यक्तिचित्रण भरीव, सुदृढ होत नाही; तसेच प्रभावी आणि प्रवाही होत नाही. अनेकदा विशिष्ट विनोद साधण्याकरिता विशिष्ट प्रसंगनिर्मिती झाली आहे आणि अशी विनोदनिर्मिती करताना लेखकाची होणारी ओढाताण आणि निर्माण झालेल्या विनोदाची आवाळ स्पष्टपणे जाणवते. उदा. ' वठे सदन ' आणि ' टणक ऊस ' यांतील अक्षरांच्या उडवाउडवीमुळे जो विनोद हाती येतो तोही तसाच जुना आणि पुसटच ठरतो. ' क ' वठे 'कर सदन ' आणि ' पा ' टणक 'र हा ' ऊस ' या त्या मूळ पाटया. तसेच पोरकट विनोदाचा आणखी एक प्रकार (पृ. ३२) ' मुलाचा चेहरा मात्र विलक्षण गंभीर होता. नेहरूनंतर कोण या प्रश्नाचं उत्तर म्हणून कदाचित् या मुलाचं नाव सुचविलं गेलं असावं असं मला क्षणभर वाटलं..." त्याच मुलाची इंग्रजी बोलण्याची पद्धत सांगून जो विनोद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे तो अशाच विनोदाचा प्रकार म्हणावा लागेल. उदा.

" नो नो. यू कम् थ्रु दिंडी. "

" आय् सेक्रेटरी ऑफ धिस् ॲकॅडमी. "

" हू ही ? युवर फादर ? " वगैरे.

परंतु बऱ्याच ठिकाणी अगदी सहज उत्तम विनोदनिर्मितीही झाली आहे. (पृष्ठ ९७) ' डॉक्टर होण्यासाठी बेडकं, झुरळं कापण्यापासून उत्तम सर्जन झाल्यानंतर देशोदेशींचे बोलावणे येतील आणि आज सकाळी नासरचा गळा कापायला विमानानं जावं लागलं तर लगेच विमानानं अमेरिकेत जाऊन प्रे. जॉन्सनचं पोट फाडावं लागेल ' वगैरे आणि डायव्हर मंमदसाब व मोरूचं काही प्रसंगातील बोलणं, लाल्याच्या कविता करणं इत्यादी प्रसंग चांगले आहेत.

श्री. गजेंद्रगडकर यांच्या कादंबरीतील (!) गुणदोष असे. तरीही ही मराठीतील पहिली विनोदी कादंबरी जरी नसली तरी अशा प्रकारचे हलके फुलके, करमणूक करणारे, वाचता वाचता काही ठिकाणी कपाळावर आठ्या उमटविणारे, तर काही ठिकाणी गालांतल्या गालात हसायला लावणारे, तर काही ठिकाणी चांगलेच खुळ-खुळून हसायला लावणारे पुस्तक आहे हे निश्चित. O

[ मोरू परतुनि आला – अरविंद गजेंद्रगडकर
प्रकाशक – केसरी प्रकाशन – मूल्य पाच रुपये ]

१४

# झुंड

| | |
|---|---|
| लेखक | ब्रिगेडिअर जे. पी. दळवी |
| अनुवाद | ॲडव्होकेट माधव कानिटकर |
| लेखांक | तेरा |

चीन-भारत संघर्षाचे भीषण नाटच चिन्यांनी एकूण तीन अंकांत घडवून आणले. कसे ?

तीन अंकी राजनैतिक लष्करी नाटक. अंक पहिला : कालखंड ९ सप्टेंबर ते २० सप्टेंबर. या कालखंडात भारतीय प्रदेशात अन्यायाने घुसून भारताच्या भूमीचा कबजा घ्यावयाचा. ठरल्याप्रमाणे या १२ दिवसांत चिनी सैनिक थागला प्रदेशात घुसले. हळूहळू थागला प्रदेशात चिनी सैन्य वाढवले गेले; कारण पुढे काय करायचंय ते आधीच ठरलेलं होतं. भारत सरकारचे चीनविषयक अजब धोरण आणि त्याला पाठिंबा देणारे भारतीय लष्करातले जनरल्स यांच्यामुळे हा अंक फारच रंगला. मित्र कुणाला म्हणू नये ते भारत सरकारला कळले आणि लष्करी नीती कधी मवाळ असून चालत नाही, ती जहालच असावी लागते, हें त्या जन-रल्सना कळले. दुसऱ्या अंकाचा कालखंड आहे, २० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर. घाईघाईने भारताने पुढचामागचा विचार न करता थागलापासून अवघ्या १५

मैलांवर भारताची सेना अपुऱ्या तयारीनिशी लुंपू ह्या ठिकाणी पाठवली. भारत सरकार आणि आर्मी-हायकमांड पुन्हा पुन्हा उच्चरवाने हेच सांगत होते की, 'चिन्यांना हुसकून द्या!' तिसऱ्या अंकाची सुरुवात झाली ती ३ ऑक्टोबर रोजी. ह्या अंकात एक प्रवेश आपलाही होता. ३ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर ह्या कालखंडात भारत सरकारने आघाडीवरच्या लेफ्टनंट जनरल उमरावसिंग ह्यांची बदली करून चिन्यांना लवकर हुसकावून देण्याच्या कामी नेमणूक केली ती लेफ्टनंट जनरल बी. एम्. कौल ह्यांची! मग काय विचारता? सातवी पायदळ तुकडी नामका-चूपर्यंत पुढे नेण्याचा हुकूम सुटला. चिन्यांना हेच व्हायला पाहिजे होते. २० ऑक्टोबर १९६२ रोजी पुढे आलेल्या या सातव्या पायदळ तुकडीचा चिन्यांनी अक्षरश: फडशा पाडला.

लष्करी इतिहासात आणि युद्धशास्त्रात 'राजकीय उद्दिष्ट साध्य करून घेण्याचा दुसरा मार्ग म्हणजे युद्ध' असे म्हटलेले आहे. राजनीती आणि लढाई ह्यांचा संबंध इतका निकटचा असतो. १९६२ च्या युद्धात आपण हरलो, कारण युद्ध सुरू असतानादेखील आपली राजनीती आक्रमक विचारसरणीची नव्हतीच. राज्यकर्त्यांची भाषाच शांतता, वाटाघाटी, मैत्री ह्या शब्दांत गुरफटलेली होती. त्यामुळेच भारत सरकार लष्करी ताकद वाढविण्याकडे दुर्लक्ष करीत होते. चीनला युद्ध नको आहे, हा आपल्या सरकारचा भोळा आशावाद होता. त्यामुळेच ज्या वेळी चीनने सत्य स्वरूप उघडकीस आले, त्या वेळी भारतीय जनता खवळली. जनता खवळलेली पाहून भारत सरकारची धांदल उडाली. राजकीय हेतू साध्य करून घेण्यासाठी भारतीय लष्कर अक्षरश: आघाडीवर पाठवण्यात आले. भारत सरकारला चीनने धडा शिकवला होता की, लष्कर आणि राजकारण हे एकमेकांपासून दूर असूच शकत नाही. लोकनियुक्त प्रतिनिधी मोठा, की लष्करी अधिकारी मोठा, हा वाद देशविघातक आहे; कारण दोघेही मोठे असतात. देशाच्या संरक्षणाच्या बाबतीत दोघांनी एकमेकांशी हस्तांदोलन करून, एकमेकांना विश्वासात घेऊन, आपापली कर्तव्ये पार पाडावयाची असतात. १९६२ च्या लढाईमध्ये आपला फज्जा उडाला ह्याला मुख्य कारण म्हणजे लष्कराची व लष्करी अधिकाऱ्यांची भारत सरकारने केलेली उपेक्षा! हिमालय पर्वतासारख्या दुर्लंघ्य व दुर्गम प्रदेशाची पूर्ण भौगोलिक माहितीदेखील जवानांना नव्हती.

ता. ११ सप्टेंबरला वरिष्ठ लष्करी अधिकारी माझ्यामागे सारखे टुमणे लावून विचारीत होते, की आसाम रायफल्स् आणि पंजाब पॅट्रोल ह्या आपल्या दोन तुकड्या आज नक्की कुठपर्यंत पोहोचल्या आहेत ते कळवा. ह्या तुकड्यांचे जवान भरधाव वेगाने धोलाच्या दिशेने पुढे जात होते. मी आणि माझे सहकारी वेळप्रसंगी जागरणे करून मिनिटा-मिनिटाला वायरलेस सेट्सवरून तिथली परिस्थिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवण्याचा प्रयत्न करीत होतो. पण त्यांच्याशी सतत संपर्क साधता

येत नव्हता. कारण आमच्याजवळील वायरलेस सेट्स जुने होते. त्याचा परिणाम मात्र असा झाला की, सातव्या पायदळ तुकडीच्या कार्यक्षमतेच्या बाबतीत व लायकीच्या बाबतीत आमच्या वर्मी लागतील असे उपहासात्मक शेरे मारले गेले. जणू काही आमच्याजवळचे जुने वायरलेस सेट्स तातडीने संदेश पाठवू शकत नाहीत, हा आमचाच दोष होता. गेली कित्येक वर्षे आर्मी ऑफिसर्स सतत भारतीय बनावटीचे नवे व कार्यक्षम वायरलेस सेट्स मिळावेत म्हणून मागणी करीत होते. मागण्या होत होत्या, होत नव्हता तो पुरवठा !

प्रत्येक वरिष्ठ अधिकारी तारस्वरात ओरडून विचारत होता की, धोलाची सुटका अजून का झाली नाही ? वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जे नकाशे होते त्यांवर पाव इंच हे अंतर प्रत्यक्षात सहा मैल होते. हा आपसातल्याच चिडाचिडीचा प्रकार अशा लष्करी अधिकाऱ्यांकडून होत होता की, जे आघाडीपासून फार मागे होते. आणि पुढे जाणे—फक्त सहा मैल पुढे जाणे—हे प्रत्यक्षात किती कठीण आहे ! वाटेत काय काय अडचणी येत आहेत ह्याची त्यांना यत्किंचितही कल्पना नव्हती. आमची त्यांच्याकडून सतत कानउघाडणी होत होती. ' हरी-अप !' (Hurry–up.) हा प्रकार आता वाचायला विनोदी वाटेल, पण एक कमांडर ह्या नात्याने त्या वेळी माझे मन विषण्ण होऊन गेले होते. इथेच एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, डोंगराळ प्रदेशात तुकड्या एक तर पुढे जाऊ शकतात व प्रत्येक तासाला आपण कुठपर्यंत आलो आहोत हे मागे कळवायचे तर त्यांचा वेळ फुकट जातो; कारण स्पेशल एरिअलची जोडणी करून वायरलेस सेट लावून घ्यायला वेळ लागतो आणि एवढा वेळ फुकट घालवूनदेखील संदेश मागे पोचण्याची शक्यता फारच कमी होती. कारण त्यांच्याजवळचे वायरलेस सेट्स जुने ! एका बाजूला चिन्यांचे टेलिफोनचे जाळे तर आपल्या बाजूला जुने वायरलेस सेट्स, अशी प्रत्येक बाबतीत ही लढाई विजोड होणार होती.

९/ पंजाब ही आपली तुकडी तावांगमधून निघून लुंपू ह्या ठिकाणी कूच करीत होती. मी कमांडिंग ऑफिसरला बोलावून सांगितले की, " वाटेत लुमला आणि शक्ती ह्या दोन ठिकाणी त्यांना विश्रांती मिळेल ह्याची काळजी घे." कारण नुसते पुढे जायचे नसून आपल्याला लढण्यासाठी पुढे जायचे आहे. ह्या तुकडीतल्या प्रत्येक जवानाला ताट–वाटी, तंबू बांधण्याचे साहित्य, वायरलेस सेट्स ह्या आवश्यक वस्तू मी स्वत: खटपट करून मिळवून दिल्या.

त्याच वेळी दिल्ली किंवा लखनौ येथील कमांड हेड-क्वार्टर्समध्ये काय घडामोडी घडत आहेत ते मला कळत नव्हते. असे म्हणतात की, ११ सप्टेंबरलाच दिल्लीला संरक्षण मंत्र्यांच्या चेंबरमध्ये एक तातडीची सभा बोलावली गेली होती. ह्या सभेला लेफ्टनंट जनरल सेन हे हजर होते. असेही म्हणतात की, त्या सभेमध्येच लेफ्टनंट जनरल सेन ह्यांनी संरक्षण मंत्र्यांना सांगितले की, " धोला ह्या

ठिकाणी अंदाजे ६०० चिनी सैनिकांनी मुसंडी मारली आहे. त्यांना तोंड देण्यासाठी आपल्या कमीत कमी एक ब्रिगेड लागेल. आघाडीवरच्या ब्रिग्रेडला मी प्रतिहल्ला करण्याचा हुकूम दिलेला आहे. ही ब्रिगेड धोला येथे पोचायला १० दिवस तरी लागतील." लेफ्टनंट जनरल सेन ह्यांचा ज्या विधानांशी संबंध जोडला जातो ती खरी असतील तर त्याची जबाबदारी फक्त त्यांच्यावरतीच पडते; कारण अशी विधाने करण्यापूर्वी कोअर-कमांडर, डिव्हिजनल-कमांडर किंवा ब्रिग्रेड-कमांडर ह्यांच्याकडून त्यांनी आघाडीवरील प्रत्यक्ष विकट परिस्थितीची काहीच माहिती मागवलेली नव्हती. मी स्वतः फक्त एक ब्रिगेड १० दिवसांत चिन्यांशी सामना देऊ शकेल की नाही, ह्याबद्दल साशंक होतो. मी त्यांना तसे वचन दिले नव्हते. कारण देऊच शकत नव्हतो. पायदळ तुकड्यांची युक्तीने हालचाल कशी करायची ह्या बाबतीत मी सर्वाधिकारी नव्हतो. मला हे कळत नाही की, धोला ह्या ठिकाणी फक्त ६०० चिनी सैनिक आहेत ही माहिती लेफ्टनंट सेन यांना दिली कुणी? चिन्यांच्या ताकदीचा खरा अंदाज आपल्याला नव्हताच! विमानातून जाऊन अंदाज घेता आला असता. पण विमाने वापरायला भारत सरकारची बंदी होती. धोला ह्या पोस्टच्या कमांडरनी ही माहिती लेफ्टनंट सेन ह्यांना पुरवली होती काय? आणि असली तरी ती कितपत विश्वासार्ह आहे ह्याची लेफ्टनंट जनरल सेन ह्यांनी खात्री पटवून घ्यायला हवी होती. कारण तो कमांडर होता एक ज्युनिअर कमिशंड ऑफीसर (JCO). सरकारी अधिकारी आणि लष्करी अधिकारी ह्यांनी ज्या बातमीला भक्कम आधार नाही, अशा ठिसूळ तपशिलावर विश्वास ठेवून निश्चित आकडा कधी सांगू नये. कारण एकदा का अशी माहिती दिली की, ती वज्रलेप ठरते. एक अंदाज चुकला की, बाकी सगळे अंदाजदेखील चुकतात. कारण हे बाकीचे अंदाज पहिल्याच चुकीच्या अंदाजावरती आधारलेले असतात. ह्या बाबतीत लेफ्टनंट जनरल सेन यांनी इंटेलिजन्स ब्युरो आणि जॉईंट इंटेलिजन्स कमिटीशी विचारविनिमय केला होता काय? केला असेल तर 'आक्रमण' ह्या शब्दाची त्यांची व्याख्या तरी काय होती? थागला प्रदेशात चीन आणखी फौजा घुसवून त्यांच्या आक्रमक पवित्र्याला बळकटी आणणारच नाही ह्याची त्यांना खात्री होती काय? कॅबिनेटच्या डिफेन्स कमिटीची बैठक तावडतोब का बोलावण्यात आली नाही? परकीय आक्रमणाशी मुकाबला करीत असताना इतका बेजबाबदारपणा दाखवून चालत नाही. लेफ्टनंट जनरल सेन यांना एक कार्यक्षम जनरल म्हणून मी अनेक वर्षे ओळखतो आणि अशा तऱ्हेचा सल्ला बेधडकपणाने ते देतील, यावर माझा विश्वासच बसत नाही. ते मत व्यक्त करण्यापूर्वी त्यांनी नक्कीच लेफ्टनंट कर्नलच्या दर्जाचा एखादा वरिष्ठ व जबाबदार अधिकारी धोला येथे पाठवून तेथील परिस्थितीची काळजीपूर्वक पाहणी करून योग्य तो रिपोर्ट पाठवण्यास सांगितले असले पाहिजे व तोपर्यंत त्यांनी कुठलेच मत व्यक्त केलेले

नसावे. निर्णय फक्त दिल्लीत घेऊन चालत नसतात. देशाच्या संरक्षणाचा विचार करीत असताना वस्तुस्थितीचा अंदाज घ्यावा लागतो. ११ सप्टेंबरच्या या सभेने अनेक खोटया आणि दुर्दैवी निर्णयांना जन्म दिला असण्याची शक्यता आहे.

'ब्रिगेड' ह्याचा अर्थ तरी जनरल सेन ह्यांनी काय घेतला होता देव जाणे ! आघाडीवरच्या शेकडो मैलांच्या परिसरात माझी फक्त एकच ब्रिग्रेड होती. ह्या ब्रिगेडमध्ये फक्त एकच बटालियन होती व ह्या कथाकथित ब्रिगेडला मदत देण्यासाठी पुरेसे जवान व शास्त्रास्त्रे नव्हती. धोला येथे चिनी सैनिकांची संख्या किती आहे व त्यांना तोंड देण्यासाठी आपली ताकद किती लागेल, ह्याचा निर्णय १-२ दिवस लांबणीवर टाकता आला नसता काय ? वादापुरते असे धरून चालू की, धोला येथे ६०० चिनी सैनिक होते. तरीदेखील जनरल सेन जर का जरा दमाने घेते तर नामका-चूसारख्या डोंगराळ आणि बिकट प्रदेशात ६०० चिन्यांशी लढणे किती कठीण आहे याचे स्पष्ट चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिले असते. एकदा बोलून बसल्यावर नंतर जनरल सेन यांच्या लक्षात आले की, तिथल्या कोअर कमांडरच्या अडचणी हा विषय आता बेचव झालेला आहे. अमुक इतक्या माणसांना तोंड देण्यासाठी अमुक एक माणसे पाठवणे याला लढाई असे म्हणत नाहीत. एवढेच कशाला ? आर्मी कमांडर या नात्याने जनरल सेन यांनी स्वतःच आघाडीवर जाऊन टेहळणी केली असती तर परिस्थितीचा अंदाज ते अधिक चांगल्या तऱ्हेने घेऊ शकले असते.

मध्यंतरीच्या काळात आपली ९/ पंजाब ही तुकडी कौतुकास्पद गतीने लुंपू येथे जाऊन पोचली. मुसळधार पाऊस, बिकट वाट व अती उंच प्रदेश या तिन्ही अडचणींवर या जवानांनी मात केली होती. त्याच वेळी लुमलाच्या बाजूने ऑफिसर कमांडिगच्या हुकमाप्रमाणे हां हां म्हणता आपली आसाम रायफल्स ही तुकडी पुढे गेली आणि तिने धोला पोस्टशी संपर्क साधला. त्यांना ते सहज शक्य झाले. कारण आधीच ते नामका-चूपासून फार जवळ होते. आसाम रायफल्सच्या जवानांना त्या प्रदेशाची चांगली माहिती होती आणि शिवाय त्यांच्याजवळ वाटाडे होतेच. हा प्रदेश माझ्या हुकमतीखाली होता. मला समाधान वाटले, पण ते एक क्षणभरदेखील टिकले नाही. कारण लष्कराच्या पायदळ तुकडया धोला येथे पोचण्यापूर्वीच आसाम रायफल्स ही तुकडी तिथे अगोदर पोचली याबद्दल बरीच कुटता निर्माण झाली आणि आमच्यावरच उलटे आरोप केले गेले. कारण काय ? तर आसाम रायफल्स ही इन्सपेक्टर जनरल ऑफ द आसाम रायफल्स (IGAR) च्या आधिपत्याखाली होती, आसाम रायफल्सचे ऑफिस तेझपूरजवळ होते आणि तिथून आसाम रायफल्स लुंपू येथील परिस्थितीबाबत डायरेक्ट रिपोर्टस् मागवीत होती. जसे काही चीन आणि भारत यांच्यांतले युद्ध म्हणजे प्रायव्हेट वॉरच होती. मला हसावे की रडावे हेच कळेना. कारण ज्या वेळी आसाम रायफल्स ही तुकडी

हळू हळू पुढे सरकत होती, त्या वेळी या विलंबाबद्दल ७ व्या पायदळ तुकडीला जबाबदार धरण्यात आले होते आणि ती तुकडी घोला येथे पोचल्याबरोबर त्याचे श्रेय उपटले होते ते आसाम रायफलसने. लढाईला सुरुवात झाली तीच मुळी अशा गोंधळात आणि एकमेकांना ओरखडे काढण्यात. कुठल्या अडचणींना तोंड देऊन आमची ९/ पंजाब ही तुकडी पुढे गेली तिकडे या परिस्थितीत दुर्लक्ष करण्यात आले. या जवानांची ही उपेक्षा–हकनाक उपेक्षा–मला सहन झाली नाही. मी पण मग संतापलो. GOC (General Officer Commanding) बरोबर माझी चांगलीच शाब्दिक चकमक झाली. नशीब की, निदान त्यानंतर तरी ९/ पंजाबचा स्तुत्य उपक्रम लक्षात घेऊन GOC ने कोअर कमांडरला कळविले की, ९/ पंजाब ही पायदळ तुकडी निर्दोष आहे. जवानांच्या कर्तव्यदक्षतेचा योग्य तो मान राखण्यासाठी इतकी यातायात करावी लागते?

१३ सप्टेंबरला पहाटे ५–३० वाजता मी लुंपू येथे जाण्यासाठी विमानतळावर गेलो. ठरल्याप्रमाणे मला घेऊन येण्यासाठी GOC हेलिकॉप्टर पाठवणार होता. ब्रिगेडिअर (आता मेजर-जनरल) कल्याणसिंग हेदेखील माझ्याचबरोबर येणार होते. पायलट आला आणि ध्यानीमनी नसताना एक गो ऽ ड अडचण उपस्थित झाली. ज्या हेलिकॉप्टरची नीट टेस्ट घेतलेली नाही अशा हेलिकॉप्टरमधून माझ्या सारख्या VIP ला नेण्यास त्याने स्पष्ट नकार दिला. पण एका अर्थाने माझी निराशा झाली होती. कारण आता मी लेफ्टनंट जनरल मिश्रांना ताबडतोब भेटू शकणार नव्हतो. पायलटने जाता जाता मला वचन दिले की, दुसरे हेलिकॉप्टर घेऊन मी उद्याच येतो. मी डिव्हिजनल हेडक्वार्टरला ताबडतोब फोन करून या गोड अपघाताची खबर दिली आणि माझी फ्लाईट एक दिवस लांबणीवर गेल्याचे कळवले.

ब्रिगेडिअर कल्याणसिंग यांना पाहून मला आश्चर्य वाटले. कारण ब्रिगेडिअर कल्याणसिंग हे कमांडर आर्टिलरी 4th डिव्हिजन होते. ते आता इथे कसे? चौकशीअन्ती त्यांनी मला सांगितले की, "तावांग सेक्टर आता त्यांच्या हुकमतीखाली सोपविण्यात आला आहे; कारण आगामी युद्धात कमांडर आर्टिलरीला खास अशी काहीच कामगिरी करता येण्यासारखी नाही. माझ्या लक्षात आले की, कुणातरी 'वरच्या' अधिकाऱ्याने स्वतः सुरक्षित राहून ही जबाबदारी कल्याणसिंगांच्या गळ्यात बांधलेली आहे. आता तो 'वरचा' सांगायला मोकळा की, तावांग सेक्टरचा इन्-चार्ज कल्याणसिंग होता. मी नव्हतो. तावांग सेक्टरमध्ये जाऊन नक्की काय कामगिरी बजवायची याची खुद्द कल्याणसिंगांना कल्पना दिली गेली नव्हती.

मी या गोष्टीचा इथे आवर्जून उल्लेख एवढ्याचसाठी केला की, ज्या ज्या बारीक सारीक चुकांमुळे आपण लढाई हरलो त्यांवर प्रकाशझोत पडावा. जखम सुरुवातीला लहानच असते पण धनुर्वात व्हायला तीच कारणीभूत ठरते. '4th

डिव्हिजनने ' डिव्हिजन या नात्याने युद्ध करून आपल्या आन्तरराष्ट्रीय कीर्तीला कधीही कलंक लावून घेतला नव्हता. तो कलंक या 4th डिव्हिजनला भारत–चीन युद्धात प्रथम लागला. 4th डिव्हिजनजवळ फक्त २ ब्रिगेडस् होत्या आणि सुमारे ३०० मैल लांबीवर या २ ब्रिगेडस् विखुरल्या गेल्या होत्या. 4th डिव्हिजनची तिसरी ब्रिगेड बोम–दिला आणि नागालँडमध्ये खास कामाकरता राखून ठेवली गेली होती. 4th डिव्हिजनही अशीच अशा तऱ्हेने कमजोर झालेली. नेफा-मधल्या आपल्या तुकड्यांना ' ब्रिगेड ', ' डिव्हिजन ' हे शब्द वापरणे म्हणजे तो वस्तुस्थितीचा विपर्यास होता. त्यांना फार फार तर ' बॉर्डर गार्डस् ' म्हणता आले असते. 4th डिव्हिजन ही केवळ आपली डिव्हिजन होती म्हणून मी ह्या डिव्हिजनच्या पराक्रमाचा अभिमान बाळगत होतो असे नव्हे. या बाबतीत एफ्. मजदलनी यांचा मी ऋणी आहे. भारताच्या 4th डिव्हिजनच्या भूतपूर्व आणि अभूतपूर्व पराक्रमाचे वर्णन करताना आपल्या ' Cassino–Portrait of Battle ' या पुस्तकात एफ्. मजदलनी म्हणतात, " युद्धाचा स्फोट होण्यापूर्वी फक्त काही दिवस अगोदरच 4th (इंडियन) डिव्हिजन इजिप्तमध्ये पोचली आणि ओसाड, निर्जन प्रदेशात युद्ध कसे करायचे याचा सखोल आणि कठोर अभ्यास तिने सुरू केला. १९४० मध्ये याच 4th डिव्हजनने ब्रिटिशांच्या 7th ब्रिटिश आर्मड डिव्हिजनबरोबर अत्युत्तम कामगिरी बजावली आणि प्रचंड संख्येने आलेल्या इटालियन फौजांचा धुव्वा उडवला. त्यानंतर लगेच Keren येथे या 4 th डिव्हिजनने प्रचंड विजय मिळवला. १९४२–४३ मध्ये देखील ओसाड प्रदेशातली लढाई म्हणजे 4th (इंडियन) डिव्हिजन ही व्याख्याच होऊन बसली. त्यानंतर मात्र ही पराक्रमी डिव्हिजन आफ्रि-



केत आराम करीत आहे. १९४४ मध्ये इटालीमधल्या Adriatic फ्रंटवरून ही 4th डिव्हिजन Cassino फ्रंटवर आणली गेली आणि तिथे या डिव्हिजनने अशी उत्तम कामगिरी बजावली की, जी या डिव्हिजनच्या पूर्वेइतिहासाला साजेशी होती. तिने हे सिद्ध करून दिले की, 4th डिव्हिजन अजिंक्य आहे ! '4th डिव्हिजन या शब्दातच जादू आहे, त्यांच्या कीर्तीचा सुगंध दरवळतो आहे."

एवढेच नव्हे, १९४३ मध्ये ट्युनिस येथे जर्मन फौजांचा कमांडर जनरल Von Arnim याने 4th (Indian) डिव्हिजनला शरणागती दिली. लढाईमध्ये जर्मन लोक काय कमी हलकटपणा करीत होते ? पण त्यांचेदेखील नाक दावले ते इंडियन 4th डिव्हिजनने. जर्मन उंटांचा काफिला सध्या GOC 4th डिव्हिजनाच्या कबजात आहे.

4th डिव्हिजनचा इतिहास हा असा तेजस्वी होता !....होता ! ....आता मात्र त्याला बट्टा लागला. कारण अशी ही 4th डिव्हिजन चीन–भारत युद्धात मात्र विखुरली गेली होती. नेता हा जनतेलादेखील ठाऊक असतो आणि जगाला-देखील ठाऊक असतो. पण दैवदुर्विलास असा की, भारतीय सेना किती पराक्रमी आहे हे सगळ्या जगाला ठाऊक असून भारतीय जनतेला मात्र ठाऊक नाही ! आपल्या कुठल्या डिव्हिजनने कुठे, कधी आणि कसा पराक्रम गाजवला हे 'जनते'ला ठाऊक नाही. कारण जनता आणि भारतीय सेना यांना एकमेकांपासून दूर ठेवण्यात येते. जनतेला माहिती द्यायची, जनतेपुढे यायचे ते फक्त नेत्यांनीच ! 4th डिव्हिजन ही काय चीज आहे हे चिन्यांना ठाऊक होते आणि म्हणूनच या डिव्हिजनचा फज्जा उडाल्याबरोबर चिनी सैन्याधिकाऱ्यांनादेखील फार आश्चर्य वाटले.

कोण जबाबदार आहे या नाचक्कीला ? कोण जबाबदार आहे या नामुष्कीला आणि अपमानास्पद परिस्थितीला ?–भारत सरकारच ! २ सप्टेंबर १९६३ रोजी संरक्षणमंत्री या नात्याने, नेफामधल्या पराभवाची कारणे सांगत असताना, माननीय श्री. यशवंतराव चव्हाण लोकसभेत म्हणाले, " भारत–चीन युद्धात भाग घेतलेल्या 4th डिव्हिजन या जगप्रसिद्ध डिव्हिजनबद्दल आता माहिती देतो. या सुप्रसिद्ध डिव्हिजनच्या नावाला या युद्धात बट्टा लागला ही खरोखरच खेदजनक बाब आहे. पण त्याहीपेक्षा जास्त दुःखदायक गोष्ट म्हणजे ही डिव्हिजन फक्त नावानंच 4th डिव्हिजन होती. कारण ही तथाकथित 4th डिव्हिजन आपल्या मूळच्या खऱ्या 4th Division च्या तुकड्यांबरोबर लढत नव्हती ! 4th डिव्हिजनला संलग्न असलेल्या खऱ्या तुकड्या दुसरीकडेच पाठवण्यात आल्या होत्या. आणि इथून तिथून कशातरी रीतीने बाकीच्या तुकड्या एकत्र करून त्यांना 4th डिव्हिजन असं नाव दिलं गेलं होतं !"

प्रत्यक्ष देशाच्या संरक्षणमंत्र्यांचा हा कबुलीजबाब ! मला कुणाचाही उपहास करायचा नाही; पण वस्तुस्थिती अशी आहे की, जनरल थापर, जनरल सेन आणि

जनरल कौल यांच्याच हुकमतीखाली 4th (Indian) डिव्हिजनने माघार घेतली. . . . . .नाव गेले ते डिव्हिजनचे !

लढाईतल्या एकूण व्यवस्थेचा हा मासला बघा. ज्या वेळी मला असे सांगण्यात आले की, माझा स्टाफ कल्याणसिंगांच्या मदतीसाठी तावांगमध्येच सोडून मी एकट्याने‌च पुढे जावे, त्या वेळी मला आश्चर्याचा धक्काच बसला. युद्धशास्त्राच्या दृष्टीने हा अक्षम्य गुन्हा होता. पुढे काय होणार आहे, याची एकतर आपल्याला कल्पना नव्हती आणि जेव्हा का चिनी पुढे घुसले त्या वेळी 'आयत्या वेळी विहिरी खणण्या 'ची आपल्या सरकारची नेहमीची आवड आपल्याला नडली. किंबहुना असेही म्हणता येईल की, पुढे काय होणार आहे याची भारत सरकारला चांगलीच कल्पना होती ! पण आर्थिक अडचणींच्या चिखलात भारत सरकारचे पाय रुतलेले आणि काहीही करून गाडा पुढे ढकलायला तर हवा. तावांगमध्ये आयत्या वेळी सेक्टर निर्माण केलेले, ते कमांडर आर्टीलरीच्या ताब्यात दिलेले आणि त्याच्या हाताखाली जो स्टाफ होता तो माझ्यासारख्या ब्रिगेड कमांडरचा स्टाफ होता आणि ब्रिगेड कमांडर ?...तो 'मिळतील' त्या तुकड्यांबरोबर 'चिन्यांना हुसकून' देण्यासाठी पुढे जाणार होता !

१२ सप्टेंबरला तेझपूर येथे जनरल उमराव, जनरल प्रसाद आणि आर्मी कमांडर जनरल सेन यांची एक बैठक झाली. त्याच वेळी चिन्यांना हुसकून लावण्याच्या भारत सरकारच्या निर्णयाची माहिती जनरल सेन यांनी पुरवली. गेल्या ३ दिवसांत 'चिन्यांना हुसकून द्या' ही घोषणा दुसऱ्यांदा होत होती. जनरल उमरावसिंग हे एकूण परिस्थितीबाबत मी व डिव्हिजन कमांडरने काढलेल्या निष्कर्षांशी सहमत होते. जनरल उमरावसिंगांनी जनरल सेनना स्पष्ट सांगितले की, केमांग फ्रॉंटियर डिव्हिजनमधील त्यांच्या तुकड्यांना चिन्यांना हुसकून देता येणे शक्य नाही. चिन्यांना हुसकणे हे प्राप्त परिस्थितीत त्यांच्या ताकदीच्या पलीकडचे कठीण काम आहे. जनरल उमरावसिंग म्हणाले, "मर्यादित स्वरूपात पायदळ तुकड्या, मर्यादित रेशन, थंड हवेत अपुरे बूट, अपुरे कपडे, अपुरी शस्त्रास्त्रं ! अशा परिस्थितीत लढाईसुद्धा अपुरी आणि मर्यादितच होणार." ईस्टर्न कमांडला इशारा देत असताना जनरल उमरावसिंग म्हणाले की, "थागला प्रदेशाच्या दक्षिणेकडे चिन्यांना हाकलून देण्याचा प्रयत्न करणं म्हणजे शुद्ध अविचार आणि उतावळेपणा करण्यासारखं आहे. त्यासाठी आपली ताकद खूप आहे, असा आभास जरी निर्माण करायचा असेल तरीदेखील त्यांना तावांग आणि नागालँडमधून फौजा काढून घ्याव्या लागतील. तावांग उघडा पडेल. कमरेचं सोडून डोक्याला बांधायचं ? तावांग हा आपला महत्त्वाचा प्रदेश आहे. एकवेळ 'वादग्रस्त' टापूतलं थोला हे ठिकाण पडलं तरी चालेल, पण तावांग सहजासहजी चिन्यांच्या हातात जाता कामा नये."

सप्टेंबर १९६२ मध्ये आपली परिस्थिती काय होती हे स्पष्ट करायला अशी

साधार आणि सयुक्तिक कारणे होती. आणि म्हणूनच 'अजून तरी शहाणपण शिका,' असे सरकारला आम्ही वेळोवेळी बजावीत होतो.

जनरल उमरावसिंग यांचे हे निवेदन वाचून तुमची खात्री पटेल की, ते स्वत: मी आणि जनरल प्रसाद, आम्ही कुठल्याही मोहजालात गुरफटलेलो नव्हतो. ता १२ सप्टेंबरपासूनच धोला या ठिकाणी चिन्यांना तोंड देण्यासाठी पुढे जाणे ही कल्पनाच विलक्षण आणि तऱ्हेवाईक होती.

जनरल उमरावसिंग यांनी एक पत्र लिहून आपले हे विचार हेडक्वार्टर ईस्टर्न कमांडला कळवले होते. हे पत्र फार महत्त्वाचे आहे. कारण भावी इतिहासकारां पुढे मूळ स्वरूपात येऊन ते साक्ष देईल की, "त्या वेळी आघाडीवर असलेल्या आणि लढाईशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांचे यथायोग्य सल्ले धुडकावले गेले !" हेच पत्र त्या अंधारात दडून बसलेल्या बेजबाबदार व्यक्तींवर प्रकाशझोत टाकून सांगेल की, " ह्यांनी ! ह्यांनी ! भारतीय लष्कराच्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केलं. म्हणण्यासारखा प्रतिकार करण्याची–प्रतिकार कशाला ?–प्रतिकाराचा आभासदेखील निर्माण करण्याची ताकद नसताना ह्यांनीच ७ व्या पायदळ तुकडीला पुढे जाण्याचा हुकूम दिला ! "

ता. १३ सप्टेंबरला संध्याकाळी ५–३० वाजता तावांगचे संरक्षण करताना काय काय अडचणी येऊ शकतील, यांची माहिती मी ब्रिगेडिअर कल्याणसिंगांना देत होतो, एवढ्यात GOC 4 कडून मला संदेश येऊ लागला. कुठल्याही प्रकारची प्रस्तावना न करता मी अजून 'पुढे' का गेलो नाही, याबद्दल त्यांनी माझी खरडपट्टी काढायला सुरुवात केली. मी चाटच झालो ! ही बोलणी मला का खावी लागताहेत याचे मला आकलन होईना, कारण हेलिकॉप्टरचा 'तो' प्रकार मी त्यांना कळवला होता व मी ताबडतोब निघू नये हे त्यांनी मान्य केले होते. माझ्याकडून कुठल्याही प्रकारचे स्पष्टीकरण होण्यापूर्वीच जनरलने मला निर्णायक हुकूम फर्मावला की, "ताबडतोब नीघ ! " (Move at once). त्यांची ती वागणूक इतकी चमत्कारिक आणि त्यांच्या नेहमीच्या मूळ स्वभावाशी विसंगत होती की, त्यामुळे माझी खात्री पटली की 'मी ताबडतोब निघावं' असा सक्त हुकूम दिला जावा अशी पराणी त्यांना कोणीतरी टोचली असावी. GOC 4 सहसा आवाज चढवून बोलत नसे. माझ्याशी तर कधीच नाही. ब्रिगेडिअर कल्याणसिंग यांचेदेखील हेच मत होते. मग हे असे कसे झाले ? नंतर जनरल प्रसाद यांनी मला सांगितले की, त्यांच्यावर आर्मी कमांडरकडून सारखा दबाव येत होता की, त्यांनी मला 'ताबडतोब पुढे' जाण्याचा हुकूम द्यावा. पण मात्र त्याच वेळी माझ्या लक्षात आले की, 'बोलविता धनी' वेगळाच आहे. . . . आणि म्हणून मी पण नाटके सुरू केली. मी GOC 4 ना कळवले की, हवामान खराब असल्यामुळे तुम्ही आत्ता काय बोललात त्यातला एक शब्ददेखील मला ऐकायला आलेला नाही ! त्यानंतर

लगेच ऑपरेटरला सांगून टाकले की, GOC ना कळवा की, थोड्या वेळाने माझ्याशी पुन्हा संपर्क साधा.

काही तासांनंतर पुन्हा संदेश आला. त्यांनी मला कळवले की, "उद्याच्या उद्या पायी नीघ. कारण नंतर सांगेन." GOC 4 ने याच वेळी मला दुसरा हुकूम दिला की, लुंपू इथे न थांबवता ९/ पंजाब ही तुकडी नामका–चूपर्यंत पुढे ने. हा निर्णयदेखील बहुधा आर्मी कमांडरचाच असावा. कुठलेही नवीन काम किंवा ध्येय डोळ्यांपुढे नसताना ठरलेल्या कार्यक्रमात होणारे हे बदल पाहून मी चकित झालो. हे दोन्ही हुकूम इतके अनिष्ट होते की, त्यांनीच पुढे अनेक अयोग्य आणि घिसाड-घाईच्या हुकुमांना चालना दिली. चिन्यांचा जास्त फायदा होईल अशा परिस्थितीत भारतीय आणि चिनी सेना समोरासमोर उभ्या ठाकल्या. दिल्लीपतींच्या मनात आहे तरी काय, ते मला कळेना. त्यांची अशी कल्पना होती की, पोलिसांची अचानक धाड पडली की जुगाऱ्यांची जशी पाचावर धारण बसते तशी पंजाब्यांना समोर नुसते पाहूनच चिन्यांची त्रेधा उडेल !

काहीही करून घोला सोडवायचं हे एकच ध्येय नजरेसमोर ठेवल्यामुळे युद्धाची आखणी, व्याप्ती आणि स्वरूप ठरलेलेच नव्हते. आणीबाणीच्या पुढच्या ३ दिवसांत मी चालत निघून काय साधणार होतो ? उलट हेलिकॉप्टरने अवघ्या २० मिनिटांत मी लुंपूला सहज पोहोचू शकलो असतो. ९/ पंजाब ही तुकडी त्यांचा कमांडर यांच्याबरोबर नसताना नामका-चूमध्ये जाऊन काय करणार होती ? त्यांना हुकूम द्यायचा कोणी ? चिनी समोर येऊन ठेपलेले. चकमकीचा क्षण फार जवळ आलेला. चालत पुढे निघालेल्या मला गुप्त संदेश कसे मिळणार होते ? ...आणि पाठवूही शकणार नव्हते मी. कारण काही खास लष्करी कारणांमुळे सांकेतिक लिपीतले गुप्त संदेश एकट्या–दुकट्याबरोबर पाठवायचे नसतात. आता तुमच्या लक्षात आले असेल की, राजकीय दडपणामुळे जर का घाईघाईने लष्करी निर्णय घेतले गेले तर आघाडीवरच्या कमांडर्सच्या मनाचा कसा गोंधळ उडतो ते ! २० ऑक्टोबरला आपला संपूर्ण पराभव करण्यात या दोन हुकुमांनी फार मोठा हातभार लावला. केवळ त्या हुकुमांशी माझा संबंध होता म्हणून नव्हे, तर त्या हुकुमामुळे लष्करी पडद्याआड आणखी एक नाटक घडत होते म्हणून ! आर्मी कमांडर जनरल सेन आणि जनरल उमराव यांचे संबंध आधीच बिघडलेले होते 'कमांडर' या नात्याने मी केव्हा पुढे जावे ? कसे जावे ? हे ठरविण्याचे क्षेत्र होते GOC जनरल उमराव यांचे. त्या क्षेत्रात आर्मी कमांडर जनरल सेन यांनी सरळ सरळ हस्तक्षेप केला होता. त्यामुळे त्या दोघांचे संबंध आणखीनच बिघडले. लढाई सुरू होण्यापूर्वीच पुढचे आणि मागचे कमांडर्स यांच्यांतली तणातणी अशी वाढलेली. लढाईमध्ये परस्परांबद्दल प्रेम, विश्वास आणि आदर लागतो तो कमी झालेला. त्याचा परिणाम भयंकर न झाला तरच नवल !

शिस्तबद्ध लष्करात आघाडीवरच्या तुकड्यांची हालचाल कशी करायची? एखाद्या ज्युनियर कमांडरला हेडक्वार्टरमधून हलवायचा की नाही? या बाबतीतले हुकूम वरिष्ठ कमांडरने द्यायचे नसतात. प्रत्येक तुकडीला विशिष्ट कामगिरी बजावून दिलेली असते. ती अमलात आणायची असते त्या तुकडीच्या कमांडरने. कमांडर जर ती कामगिरी बजावू शकला नाही तर त्याला तिथे कमांडर म्हणून न ठेवता दुसरीकडे हलवायचा असतो. GOC 4 ने ९/ पंजाब या तुकडीवर सोपविलेली कामगिरी ९/ पंजाबने व्यवस्थित पार पाडली होती. काही खास कारणाशिवाय ही तुकडी नामका–चू पर्यंत पुढे न्या, असा तोंडी हुकूम देणे हे आर्मी कमांडरचे काम नव्हते आणि हुकूम द्यायचाच होता तर त्यांनी तो प्रथम कोअर कमांडरला द्यायला हवा होता. आघाडीवरच्या कमांडर्सच्या कार्यक्षेत्रात तोंडी हुकूम देऊन ढवळाढवळ करण्याचा हा प्रकार १३ सप्टेंबरपासूनच सुरू झाला.

वरपासून खालपर्यंत हुकूम कसा गेला पाहिजे याची जी शिस्त होती त्या शिस्तीचे संतापाने आणि दडपणामुळे दिल्या गेलेल्या या दोन हुकुमांमुळे तुकडे तुकडे झाले. त्याचा परिणाम असा झाला की, २५ सप्टेंबरपर्यंत कमांडिंग ऑफिसर्स, ब्रिगेड कमांडर आणि GOC 4 डिव्हिजन हे एकमेकांशी संपर्क साधू शकले नाहीत. कोण काय करतोय? काय करायला पाहिजे? हे कळायला मार्ग नव्हता. त्यामुळे आपसांतच तावातावाने भांडणे होत होती. आणि ही स्थिती चिनी अगदी समोर उभे ठाकलेले दिसत असताना! लष्करी अधिकाऱ्याचा एक हुकूम चुकला तर त्याचे परिणाम असे भयंकर होतात.

हुकुमाप्रमाणे ९/ पंजाब ही तुकडी नामका–चूमध्ये पाय रोवून बसली. चिनी आणि ९/ पंजाब आमनेसामने आलेले आणि ९/ पंजाबचा कमांडरच त्यांच्याबरोबर नाही! कुठल्याही क्षणी काहीही होण्याची शक्यता असल्यामुळे ९/ पंजाबला आता तिथून हलवता येत नव्हते. थागला प्रदेशात सुमारे २०० मैलांच्या परिसरात विखुरलेली आणि तिथल्या हवामानाचा सराव झालेली जी एकमेव बटालियन होती, ती कुचकामी ठरली. कारण या बटालियनपैकी ९/ पंजाब ही तुकडी पुढे गेलेली; पण तिची जागा भरून काढण्यासाठी पाठीमागून नवी कुमक मात्र पाठविण्यात आलेली नव्हती. एका पाठोपाठ एक अशा सतत तुकड्या आघाडीवर पाठवून सैन्याच्या हालचालीला गती देण्याऐवजी आपण फक्त जे सैन्य सुरुवातीलाच आघाडीवर 'पाठवले' गेले होते त्यातल्याच तुकड्या आणखी पुढे नेऊन आपल्याच जवानांची ताकद खच्ची करत होतो. अशीच घाई पुढे आणखी काही दिवस चालू होती.

पर्वतमय प्रदेशात काळोख फार लवकर पडतो. तावांगमध्ये तर दुपारी २–३० वाजता सूर्य मावळतो! दुपारचे अडीच म्हटले की, तुमच्या डोळ्यांसमोर कडकडीत ऊन येत असेल, पण तावांगमध्ये त्या वेळी काळोख असतो. तिथे अंतर आणि वेळ

मोजली जाते ती मैलांवर आणि घड्याळांवर. नाहीतर टप्प्यांवर. आज एका ठिकाणाहून निघालो तर पुढचा टप्पा दुपारी २च्या आत गाठला पाहिजे. " उद्याच्या उद्या पायी नीघ." हा मला मिळालेला हुकूम हास्यास्पद होता. असे किती अंतर पायी जाऊ शकणार होतो मी दुपारी २ वाजेपर्यंत ? ब्रिगेड कमांडर त्याच्या पार्टी-बरोबर पुढे जातो, तेव्हा सामान उचलायला कमीत कमी ५० हमाल लागतात. माझा रोव्हर वायरलेस सेट उचलून न्यायला माझ्याजवळचे फक्त १४ हमाल पुरेसे होते ? मला हुकूम मिळाला होता तो संध्याकाळी. बाकीच्या हमालांची सोय अवघ्या काही तासांत कशी करू शकणार होतो मी ? आणि एवढा आटापिटा करून 'पुढे जाण्या'त खास अशी कोणती कामगिरी होती माझ्यावर ? मला कळेना की मी ब्रिगेड कमांडर आहे का कोण आहे ? कारण ब्रिगेड कमांडरने कधी एकदम पुढे घुसायचे नसते तर ब्रिगेडच्या थोडे पाठीमागेच राहून प्राप्त परिस्थितीत काय करायला पाहिजे याचे मार्गदर्शन त्यांनी ब्रिगेडला करायचे असते. कमांडरच जर का एकदम पुढे घुसला तर लढाईच्या धुमश्चक्रीत तो स्वतःला हरवून बसतो. कमांडर दिसेनासा झाला, की परिस्थितीचा विपर्यास केला जातो. पानिपतच्या भाऊगर्दीत विश्वासरावाला गोळी लागल्याबरोबर मागे पळापळ सुरू झाली ती यामुळेच. अर्थात रणक्षेत्राला कमांडरने वेळोवेळी भेट देऊन परिस्थितीचे आकलन करून घेतले पाहिजे, तिथल्या भौगोलिक परिस्थितीची त्याने ओळख करून घ्याय-लाच पाहिजे. पण कमांडरने स्वतःच हातात सूत्रे घेऊन पुढे केव्हा घुसायचे हा निर्णय कमांडरने स्वतःच घ्यायचा असतो. त्याला असा कधी वरून हुकूम दिला जात नाही की, " उद्याच्या उद्या नीघ ! आणि पुढे जा !"...काही का असेना. हुकूम तर मिळाला होता. तो पाळणे माझे कर्तव्य होते.

१४ सप्टेंबरला पहाटे ५ वाजता माझे इंटेलिजन्स ऑफिसर, कॅप्टन, टी. के. गुप्ता आणि इतर माझे सहकारी यांच्यासमवेत मी तावांग सोडले. माझे सिनीयर स्टाफ ऑफिसर्स मात्र माझ्यावरोबर नव्हते. सामानाची बांधाबांध करणे आणि हमाल मिळवणे या कामात माझ्या स्टाफने काल रात्रभर जागरण केले होते. वाटेत आम्हांला कुठल्याही गोष्टीसाठी कुणावरही अवलंबून राहता येण्यासारखे नव्हते. खाण्या-पिण्यासारख्या आवश्यक वस्तूंपासून तो वायरलेसचे चार्जिंग सेट्स, बॅटरीज् आणि त्यांना लागणाऱ्या सरपणापर्यंत सर्व वस्तू आम्ही बरोबर घेतल्या होत्या. प्रत्येक डाग अगडबंब आणि अवजड झाला होता. आम्ही निघालो त्याच वेळी वादळी वारे सुटलेले होते. वाटेतच मुसळधार पाऊस सुरू झाला. तशातच एखादे शांत चेहऱ्याचे प्रेत पांढऱ्या शुभ्र कापडात गुंडाळलेले दिसावे तसे तावांग धुक्यात गुरफटून गेलेले होते. का बरे अशी अभद्र उपमा मला त्या वेळी सुचली ? वातावरण कुंद होते म्हणून ? कदाचित त्याच क्षणी नियतीने मला इशारा दिला असेल की, 'भारताचा सुंदर प्रदेश म्हणून तावांग आत्ताच नीट पाहून घे, पुन्हा कधी पाहायला मिळणार

नाही !' ज्या पद्धतीने मला हेडक्वार्टरमधून बाहेर काढण्यात आले होते त्या पद्धतीमुळे माझी मानखंडना झाली होती. माझ्यासारख्या सिनीयर कमांडरची शारीरिक शक्ती आणि वेळ वाचवावा या हेतूने हेलिकॉप्टर पाठवले असते तर काय बिघडणार होते ?

फार दमछाक झाल्यानंतर आम्ही लुमला या ठिकाणी अंधार पडल्यानंतर पोचलो. वाटेत अनेक ठिकाणी मी ९/ पंजाबशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण माझे प्रयत्न निष्फळ ठरले. तरीदेखील मी खूष होतो. कारण पर्वतमय प्रदेशात २२ मैलांचे अंतर आम्ही अवघ्या काही तासांत काटले होते. उंच प्रदेशात हवामानाचा सराव का करून घ्यावा लागतो त्याची किंमत आता कळली. मी अत्यंत नम्रपणे सांगतो की, या खडतर प्रवासात मी एक दिवसदेखील आजारी पडलो नाही. माझ्याबरोबरीच्या सहकाऱ्यांचे हाल आणि कष्ट यांच्यांत सहभागी होत असतानादेखील मला एका गोष्टीची जाणीव होती की, वाटेत कमांडरच जर का आडवा झाला तर त्याचा परिणाम बाकीच्यांच्यावर पण होईल.

दुसऱ्या दिवशी—१५ सप्टेंबरला—आणखी १८ मैल चालत जाऊन आम्ही शक्तीपर्यंत पोचलो. आघाडीवरच्या माझ्या जवानांची काहीच खबर मला अजून मिळत नव्हती. आपल्या तुकड्यांपासून दूर असल्यामुळे आपल्या जवानांचीच खबर न मिळणे किंवा वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या खलबतांमुळे आपल्या पुढ्यात काय वाढून ठेवणार आहेत याची कल्पना नसणे यांसारखी मानसिक विफलता आणि संकटे कमांडरच्या आयुष्यात दुसरी कुठलीच नसतात.

१६ सप्टेंबरला आम्ही भल्या पहाटे निघालो आणि दुपारी ३ वाजता लुंपूला येऊन पोचलो. वाटेत सतत पाऊस, थंडी आणि चिखल ! आम्ही दमून गेलो. वाटले 'कोरडा' हा शब्द आमच्या देहांना उद्देशून या जन्मात लागणार आहे की नाही ? अगदी आघाडीवरच्या जवानांना रसद पोचवण्याचे मुख्य काम लुंपू येथे ९ / पंजाब ही तुकडी आसाम रायफल्सच्या मदतीने करीत होती. या कामाचा इन-चार्ज होता सेकंड इन कमांड (2 I/C) 9 पंजाब. विमानातून टाकल्या गेलेल्या पिशव्या गोळा करणे, त्यातले अन्न-पाणी नामका-चूपर्यंत पुढे पोचवणे, त्याचप्रमाणे मागे अधिक त्या मालाची मागणी करणे, तावांग आणि तेझपूरमधील हेडक्वार्टर्सशी वायरलेसने संपर्क ठेवणे या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडायच्या होत्या. कशा पार पाडणार होता तो ? कारण ह्या जबाबदाऱ्या मुख्यतः हेडक्वार्टर्सच्या असतात. पायदळ तुकडीच्या सेकंड इन कमांडच्या नसतात.

९ / पंजाब ही तुकडी घाईघाईने थागला प्रदेशात पुढे आणण्याचा हुकम हा बहुधा १३–१४ सप्टेंबरला दिल्लीत घेतल्या गेलेल्या ' निर्णयां 'चा परिपाक असावा. असे म्हणतात की, १३ सप्टेंबरला आर्मी चीफ जनरल थापर यांनी संरक्षण मंत्र्यांना अशी माहिती दिली की, ' घोला या ठिकाणी आता ६०० नव्हेत तर फक्त ६०

चिनी सैनिक आहेत.' आणि म्हणून बहुधा त्यांनी आर्मी कमांडरला हुकूम दिला असावा की, सबंध ब्रिगेडची जमवाजमव होईपर्यंत न थांबता अवघ्या ५०–६० चिन्यांना तावडतोब हुसकून द्या ! आर्मी कमांडर सेन यांनी लगेच ९ / पंजाबला हुकूम फर्मावला की, "शक्यतितक्या जलदगतीने पुढे जा ! जे जे आर्मी चीफस् आणि आर्मी कमांडर्स इतक्या ढिलाईने आणि निष्काळजीपणाने आपली कर्तव्ये (कशीतरी) पार पाडत त्यांना इतिहास दया दाखवणार नाही. लढाईत आशावादी राहून चालत नाही. प्रतिकूल तेच बहुधा घडेल, असे धरून चालावे लागते. आघाडी-वर प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे याची कमांडरबरोबर चर्चा न करताच, कुठून तरी मिळालेल्या माहितीवर अवलंबून राहून हुकूम सोडणे हे तर त्याहून वाईट !

युद्धशास्त्रात ही एक कुप्रसिद्ध वस्तुस्थिती असते की, आघाडीवरच्या दुर्दैवी बटालियन आणि कंपनी कमांडर्सपेक्षा आर्मी हेडक्वार्टरला किंवा सरकारला शत्रूची ताकद नेहमीच कमी भासते. तरीदेखील जनरल थापर यांचा शत्रूच्या ताकदीचा जो अंदाज होता तो कुठल्याही परिस्थितीत असमर्थनीय आणि विलक्षण होता. थागला प्रदेशात सरतेशेवटी चिन्यांनी एकूण किती चिनी पाठवले ? ६० ? ६०० ? छे : छे : ! २०,००० ! आर्मी चीफकडून कमीत कमी एवढी अपेक्षा होती की, त्यांनी आपले मत व्यक्त करण्यापूर्वी आघाडीवरून रिपोर्ट मागवायला हवा होता. मी हा मुद्दा पुन्हा पुन्हा एवढ्याचसाठी सांगतोय की, तुमच्या लक्षात यावे की थागला प्रदेशात युद्धाला प्रत्यक्ष तोंड लागण्यापूर्वी आपण त्यांच्याकडे फक्त 'सरहद्दीवरचा प्रकार' या दृष्टिकोणातूनच पाहत होतो. हा 'प्रकार' नसून ही लढाई आहे हे वरिष्ठ लष्करी अधिकारी समजून चुकले असते तर त्यांचा दृष्टिकोण अधिक दूरदर्शी आणि चौकस झाला असता. १३ सप्टेंबरच्या त्या मिटिंगमध्ये जी परिस्थिती कुठल्याही क्षणी स्फोटक ठरण्याची शक्यता होती तिच्याकडे दुर्लक्ष केले गेले. दिल्लीत आरामखुर्चीत पडून (!) देशाचे धोरण ठरवणारे नेते आणि दिल्लीतच बसून लष्करी डावपेचांची आखणी करणारे लष्करी अधिकारी यांचा असा भ्रम होता की, फक्त ५०–६० चिन्यांना थागलामधून हाकलून देण्याची ही सुवर्णसंधी दवडता कामा नये. पुढे होऊन हल्ला केला की, ते ५०–६० चिनी धसका घेतील, त्यांची गाळण उडेल ! हां हां म्हणता आपण थागला प्रदेशातली शिखरे गाठू. त्यानंतर मात्र चीन–भारत सीमातंटा इतिहासजमा होईल. मग विविध क्षेत्रांतली 'मोठी माणसं' तिथे येतील... फोटोग्राफर हजर असतीलच ! मग नेहमीप्रमाणे जवानांचे कौतुक, भाषणे आणि हारतुरे !

याच विचारसरणीने आपला विश्वासघात केला. कारण लढाई आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या अनंत अडचणी यांचा कार्यक्रमच आपल्या डोळ्यांसमोर नव्हता. चिनी कुठल्याही क्षणी प्रचंड चिनी सैन्य पुढे आणू शकतील हे आपल्याला ठाऊक असायला हवे होते. कुठल्याही आघाडीवरच्या कमांडरने इतके ढिले हुकूम दिले नसते.

१४ सप्टेंबरला दिल्लीमध्ये आणखी एक मिटिंग घेतली गेली. एका दिवसात आर्मी चीफच्या मतांत बरेच अंतर पडले होते. आदल्या दिवशी त्यांचे मत असे होते की, संख्येने थोड्या असलेल्या चिनी सैनिकांना आपली एक बटालियन सहज हुसकून देऊ शकेल, तर १४ सप्टेंबरच्या मिटिंगमध्ये आर्मी चीफनी भारत सरकारला आपल्या लष्करातल्या उणिवांची आणि कमतरतेची आठवण करून देऊन गंभीर इशारा दिला की, लडाख किंवा नेफामध्ये आपल्या फौजा लढू शकणार नाहीत. कारण चिनी प्रचंड संख्येने आले तर बदला घेणे आपल्याला कठीण जाईल या सभेला उपस्थित असलेल्या लेफ्टनंट-जनरल दौलतसिंग, जनरल ऑफिसर, कमांडिंग-इन्-चीफ, वेस्टर्न कमांड यांनी लडाखमध्ये घडणाऱ्या पुढच्या अनर्थाचे भविष्य वर्तविले.. जनरल सेन म्हणाले की, "चिनी सैन्य झुंडीने आले तर त्यांना प्रतिकार करणं जनरल सेनना शक्य होणार नाही." इतके स्पष्ट इशारे मिळत असूनदेखील भारत सरकारने संभाव्य परिणामांचा विचार न करता असा निर्णय घेतला की, काय व्हायचं असेल ते होऊ दे ! चिन्यांना अधिक आत येऊ देता कामा नये. आता हीच वेळ आहे की ज्या वेळी कुठल्यातरी एका ठिकाणी त्यांच्या तटबंदीला तडा पाडला पाहिजे. भारतीय प्रदेशात चिन्यांकडून वारंवार होणारी आक्रमणे इथून पुढे आम्ही सहन करणार नाही.

साहजिकच असल्या विचारसरणीत लष्करी डावपेच आणि वस्तुस्थिती यांना जागा नव्हती. चिन्यांना अतिक्रमण करून द्यायचे नाही. बस् ! यापेक्षा दुसरा विचार नाही. इतकी वर्षे भारत सरकार सत्य-अहिंसेच्या जपमाळा ओढत बसले होते. कुणावरही आक्रमण करावयाचे नाही हे आपले सतत १५ वर्षांचे धोरण होते. कुणी आलाच तर फक्त आपला बचाव करायचा, ही पॉलिसी होती. आणि आता सरकार एकदम कोलांटी उडी मारून अगदी दुसऱ्या टोकाला जाऊन 'हीरो' बनण्याचा प्रयत्न करीत होते. ज्यांना अनेक वर्षे फक्त बचाव करायचीच सवय झालेली असते त्यांना यशस्वी आक्रमण कधीच करता येत नाही. तशातच इतकी वर्षे लष्कराच्या यथायोग्य मागण्यांच्या बाबतीत भारत सरकारने कंजुषपणा दाखविलेला... आणि शत्रू पाकिस्तानसारखा भेकड नव्हता तर चीनसारखा बलाढ्य ! भारतीय भूमीच्या हव्यासाने वेडापिसा झालेला !

'चिन्यांना हुसकून देण्या'चा प्रखर आणि बाह्यात्कारी ठाम निर्णय घेतला गेला तो संरक्षणमंत्री, आर्मी चीफ, आणि २ आर्मी कमांडर्स यांच्या सभेत. सबंध देशाचे प्राक्तन ज्या दिवशी ठरले त्या दिवशी पंतप्रधान आणि अर्थमंत्री दोघेही परदेशांच्या दौऱ्यावर होते. मग संरक्षणमंत्र्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर हा निर्णय घेतला काय ? संरक्षणमंत्र्यांना असा एकट्याने निर्णय घेण्याचा अधिकार आहे काय ? भारत सरकारच्या डिफेन्स कमिटी ऑफ कॅबिनेट (DCC) चे हक्क संरक्षणमंत्र्यांनी गैरवाजवीरीत्या वापरले काय ? सबंध देश युद्धाच्या खाईत

लोटण्यापूर्वी संरक्षणमंत्र्यांनी D C C च्या इतर मान्यवर सभासदांशी विचार-विनिमय केला होता काय? स्वर्गीय लालबहादूर शास्त्री हे त्या वेळी गृहमंत्री होते आणि D C C चे कायम सभासद या नात्याने ते दिल्लीतच हजर होते. त्यांच्याशी संरक्षणमंत्री श्री. कृष्णमेनन यांनी का विचारविनिमय केला नाही? परदेशांच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधानांना ताबडतोब परत येण्याचा सल्ला का दिला गेला नाही? युद्धाची व्यवस्थित आखणी करण्याची जबाबदारी असलेली सरकारची वेगवेगळी खाती त्या वेळेस काय करीत होती? १३–१४ सप्टेंबरच्या सुमारास भारतीय जनता खरोखरच इतकी चवताळून उठली होती का की, ज्यामुळे निर्णय घाईघाईत घ्यावेच लागले? का सरकारने जनतेशी दुरावा निर्माण करून जो मूर्खपणा केला होता, सरकारी अधिकाऱ्यांनी जी चुकीची भडक वक्तव्ये केली होती त्यांमुळे जनता पेटून उठली? कुणी चेतावले जनतेला? ज्या भारतीय जनतेपासून सत्य दडवून ठेवून भारत सरकारने तिची सतत फसवणूक केली त्या जनतेची युद्धाची भूक, जगातल्या एका पहिल्या दर्जाच्या ताकदीशी लढण्याचा निर्णय घेण्यासाठी निमित्त मिळावे म्हणून कुणी प्रज्वलित केली? जनता खवळली म्हणून घाईघाईने निर्णय घ्यावे लागले, असा कांगावा करण्यापूर्वी भारत सरकारने वरील सर्व प्रश्नांची उत्तरे अगोदर दिली पाहिजेत. राजकारणाचे वारे कसेही वाहोत, देशाच्या तज्ज्ञ लष्करी अधिकाऱ्यांचे सल्ले धुडकावून देऊन दूरगामी निर्णय घेण्याचा अधिकार फक्त एका किंवा काही विशिष्ट लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हातात असता कामा नये. कारण लोकनियुक्त प्रतिनिधींपेक्षा देश कितीतरी पटींनी मोठा असतो.

पुढे जाऊन चिन्यांना हुसकून देण्याचा निर्णय भारत सरकारने घेतल्याबरोबर चीफ ऑफ दि आर्मी स्टाफने ताबडतोब रजेवर असलेल्या C G S जनरल कौलना परत बोलावून घ्यायला हवे होते. परदेशांतून पंतप्रधान नेहरू परत आल्यानंतर ही गोष्ट केली गेली. त्या वेळी २ ऑक्टोबर उजाडला होता. ८ सप्टेंबरपासून आघाडीवर घडणाऱ्या दैनंदिन घटना जर का जनरल कौलना समजत असत्या, तर चिन्यांना हुसकून देण्याची जबाबदारी जनरल कौलनी स्वीकारली असती की नाही याबद्दल मला शंका आहे! एक धाडसी आणि चपळ जनरल म्हणून जनरल कौलचा लौकीक होता. साहजिकच परिस्थितीचा अंदाज घेता यावा म्हणून तावांग आणि तेझपूरला त्यांनी नक्कीच भेट दिली असती. नोव्हेंबर १९६१ मध्ये जनरल कौलनी तावांगला भेट दिली होती खरी. त्याच वेळी त्यांना आपल्यापुढील गंभीर प्रश्नांची जाणीव झाली होती. ‘डिस्पाइट अवर डिफिकल्टीज...’ असे ते म्हणाले ते काय उगाच? पण जर का सप्टेंबर–ऑक्टोबर ६२ मध्ये त्यांनी आघाडीला भेट दिली असती तर त्यांच्या मनातला ‘डिस्पाईट’ जाऊन फक्त ‘डिफिकल्टीज!’ उरल्या असत्या. चिन्यांना हुसकणे वाटते तितके सोपे नाही हे त्यांनीच सांगितले असते. त्या वेळी घडलेल्या घटनांकडे पुन्हा एकदा दृष्टिक्षेप टाकल्यानंतर सहज

लक्षात येते की, जनरल कौल अवेळीच रजेवर होते आणि त्यांना तावडतोब परत न बोलावणे ही घोडचूक होती. चिन्यांना हुसकून देण्याच्या कामी वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या दृष्टिकोण किती सामान्य होता याचा कौलची रजा हा एक उत्तम नमुना आहे !

कारण वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याची गैरहजेरी किंवा रजा एवढी एकच गोष्ट शत्रूच्या कपटनीतीला अर्धा विजय मिळवून देऊ शकते. जगामध्ये अशी उदाहरणे अनेक आहेत. एक उदाहरण आत्ताच देतो. दुसऱ्या महायुद्धात, ११ मे १९४४ ला Cassino च्या लढाईत फिल्ड मार्शल ॲलेक्झांडरचा कव्हर प्लॅन अपेक्षेवाहेर यशस्वी ठरला. कारण त्या दिवशी जर्मनांच्या १४ व्या पँझर कोअरचा कमांडर जनरल Von Senger रजेवर होता ! आणि त्यांचा दुसरा जनरल, Von Vtetinghoff, हा त्याच वेळी रजेवर जायच्या बेतात होता. सप्टेंबर १९६२ मध्ये भारतावर आक्रमण करण्याच्या निश्चित धोरणाने चिन्यांचे लष्करी डावपेच सुरू झाले होते. भारतीय लष्कर कुठे आणि कसे कोंडायचे याची कपट-कारस्थाने चीन करीत असतानाच–आपले महत्त्वाचे लष्करी अधिकारी रजेवर होते !

मी लुंपूमध्ये आलो त्याच दिवशी म्हणजे १६ सप्टेंबरला भारत सरकारचा एक प्रवक्ता म्हणाला, "भारतीय सरहद्दीच्या बाहेरच चिन्यांना रोखून धरण्याच्या दृष्टीने योग्य ती परिणामकारक योजना करण्यात आली आहे अशी भारत सरकारची खात्री पटली आहे." मला आश्चर्याचा धक्का बसला. कारण १६ सप्टेंबरला चिनी सैनिक अगोदरच आत होते आणि त्यांना तोंड देण्यासाठी ९/पंजाब ही आपली तुकडी सुमारे ७ मैल विखुरली गेली होती. या सरकारी प्रवक्त्याला ते ठाऊक नसावे. भारत सरकारला इतका आत्मविश्वास यावा इतका धीर दिला तरी कुणी हे पाहणे मोठे मनोरंजक ठरेल. कारण चिनी १६ सप्टेंबरलाच अशा उत्तम परिस्थितीत होते की, कुठल्याही क्षणी आणि कुठूनही ते पुढे येऊ शकले असते. ही अशी बेफाम आणि चुकीची विधाने सरकारकडून वेळोवेळी (म्हणजे नको त्या वेळी ! ) होत असल्यामुळेच भारतीय जनतेच्या अंगात वीरश्री संचारली. साहजिकच आहे. सर्वसामान्य माणूस असेच म्हणणार की 'इतकी तयारी आहे ना ? मग वडवा धरून चिन्यांना !' पण जेव्हा का दणदणीत पराभव आपलाच झाला, तेव्हा जनतेच्या या वीरश्रीला भारत सरकारने शब्द शोधला तो 'जनता खवळली' हा ! लष्करी तयारीचा आणि संभाव्य लढाईच्या परिणामांचा सरकारने नीट अभ्यास करून पावले टाकली असती तर जनता इतक्या लवकर खवळली नसती.

तावांग ते लुंपू हा खडतर प्रवास पायी करून मी दमलो होतो. मी ठरवले की की आता थोडा वेळ विश्रान्ती घ्यायची. (क्रमश:)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

डॉ. चं. रा. तळपदे

# चंद्रावरून येणारे अनाहूत पाहुणे

'ऑपरेशन चंद्र!'


—'ऑपरेशन चंद्र' या एका शब्दानं आज जगभर लोकांना भारावून टाकलंय! अखेर माणूस चंद्रावर उतरणार, ही नुसती कल्पनाही केवढी भव्य आहे. चंद्रावर उतरण्याच्या या हनुमान उडीत विज्ञानाला अनेक संकटांचा फडशा पाडावा लागला. अपोलो वा सॅटर्नच्या प्रत्येक उड्डाणाच्या वेळी निरनिराळ्या प्रश्नांचा अभ्यास होत होता; पण प्रत्यक्ष चंद्रावर उतरण्यात जे धोके आहेत, त्यांचा अभ्यास मात्र अजूनही झालेला नाही. त्याची कल्पना अखेर माणूस चंद्रावर उतरणार, त्याच वेळी येणार! —आतापर्यंतच्या अपोलोंच्या उड्डाणाचा कालखंड म्हणजे तसा मधु-चंद्राचा कालखंड होता. याउलट अपोलो ११ म्हणजे प्रत्यक्ष संसाराला सुरुवात होण्याची वेळ! —प्रत्यक्ष संसार सुरू करताना ज्या समस्या निर्माण होतात त्यांची कल्पना काही मधुचंद्राच्या अनुभवावरून येत नाही! —चंद्राभोवती लांबून रुंजी घालणाऱ्या इतर अपोलोंना, अपोलो ११ ला जे साहस करावयाचे आहे त्याची कल्पनाही नसेल.

तसे पाहिले तर अंतराळवीरांना चंद्रावर कसे उतरवावयाचे याची योजना अगदी तपशीलवार तयार झाली आहे. अपोलो ११ मध्ये बहुधा तीन अंतराळवीर असतील. त्यांपैकी एकजण अपोलो चंद्राभोवती भ्रमण करीत असताना अपोलोमध्येच बसून असेल. बाकीचे दोघे चंद्रयानात बसून चंद्रयानासह चंद्रावर उतरतील. आता हे दोघे काही केवळ सहलीसाठी म्हणून चंद्रावर उतरणार नाहीत! चंद्रावर उतरल्यावर त्यांना दोन महत्त्वाची कामे करावयाची आहेत. चंद्राच्या पृष्ठभागावर योग्य प्रकारची यंत्रे ठेवून या स्वयंचलित यंत्रांकडून निदान एक वर्षपर्यंत चंद्रावरील वातावरणाची माहिती पोचवण्याचे काम होईल, अशी व्यवस्था करणे, हे त्यांचे पहिले काम राहील. ह्या यंत्रामध्ये चंद्राच्या पृष्ठभागावरील भूकंपांची नोंद घेणारी 'सिस्मोमीटर'सारखी यंत्रे राहतील. ह्या यंत्रांमुळे चंद्राच्या पृष्ठभागात भूकंप चाल

आहेत की नाहीत, भूकंप चालू असल्यास ते किती कालांतराने किंवा किती तीव्रतेने होतात याची माहिती गोळा करून पृथ्वीवर पाठविण्यात येईल. ‘ मॅग्नोटोमीटर ’-सारख्या यंत्रामुळे चंद्राच्या पृष्ठभागातील चंवकीय क्षेत्रात होणाऱ्या फरकांची नोंद घेण्यात येईल. अंतराळवीरांवर सोपविण्यात येणारे दुसरे काम म्हणजे खनिज-शास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असे ३५ ते ५० पौंड वजनाचे नमुने गोळा करून ते अॅल्युमिनियमच्या डब्यात भरून ते डबे सीलबंद करणे व ते आपल्याबरोबर पृथ्वी-वर घेऊन येणे. चंद्रावरील ही स्वारी संपून अंतराळवीर पृथ्वीतलावर आल्यावर त्यांनी आणलेल्या विविध प्रकारच्या नमुन्यांचे परीक्षण तावडतोब सुरू होईल. त्यासाठी निरनिराळ्या देशांतील शास्त्रज्ञांची मदत घेण्यात येईल. ह्या अभ्यासातून जी माहिती बाहेर पडेल तीमुळे चंद्राचे सत्यस्वरूप, आणखी चंद्राची उत्पत्ती ह्यांवर प्रकाश पडेल.

पण या साऱ्या, साध्या सोप्या कार्यक्रमात एक महत्त्वाचा धोका आहे. आपल्या लक्षातही न आलेला तो धोका फार महत्त्वाचा आहे. चंद्राच्या पृष्ठभागातील नमुन्यांबरोबर चंद्रावरील विषाणू, जीवाणू आणि जीवाणूगर्भ नकळत पृथ्वीतलावर येतील आणि या प्रकारचे जीवाणू, विषाणू पृथ्वीतलावर नसल्याने त्यांच्याबद्दलची प्रतिकारक्षमता पृथ्वीतलावरील प्राण्यांमध्ये–माणसांतसुद्धा–असणार नाही आणि मग चंद्रावर स्वारी करता करता, काहीतरी गूढ रोगराई सुरू करण्याचे अपयश मात्र अमेरिकन शास्त्रज्ञांना आपल्या पदरात घ्यावे लागेल. या अपयशाचे धनी होऊ नये यासाठी अमेरिकन शास्त्रज्ञांनी आपल्याकडून फार मोठी सावधगिरी बाळगली आहे. या सावधगिरीचा एक भाग म्हणजे चंद्रावरून परत आलेली माणसे आणि इतर साहित्य उतरवून घेण्यासाठी सात कोटी रुपये खर्च करून, टेक्सास संस्थानात हौस्टन शहराजवळ ‘ स्वागतशाळा ’ [ ल्युनर रिसिव्हिंग लॅबोरेटरी ] उभारलेली आहे.

चंद्रावर स्वारी करून अपोलो ११ महासागरात उतरल्यावर अवकाशवीरांनी आणलेले नमुने, छायाचित्रे, ध्वनिमुद्रिते व इतर सर्व गोष्टी जेट विमानाने अगदी शक्य तितक्या थोड्या वेळात स्वागतशाळेत नेण्यात येतील. अवकाशवीरांना अपोलो ११ मधील राहत्या जागेमधून बाहेर पडण्यासाठी एक वेगळ्या प्रकारचा प्लॅस्टिकचा बोगदा तयार केला आहे. त्या बोगद्यातून ते तीन अवकाशवीर संसर्ग-विरोध यानात प्रवेश करतील. या यानात एक डॉक्टर आणि एक इंजिनीअर त्या अंतराळवीरांचे स्वागत करावयास हजर असतील. हे संसर्गविरोध यान स्वागत-शाळेत जाऊन पोचावयास साधारणपणे पाच दिवस लागतील, असा अंदाज आहे. या पाच दिवसांच्या कालखंडात डॉक्टरसकट या अंतराळवीरांना फार मोठी पथ्ये पाळावी लागतील. त्यांच्या श्वासोच्छवासाने बाहेर पडणारी हवा यानाबाहेर टाकण्यापूर्वी खास प्रकारच्या गाळण्यांतून गाळून घेतली जाईल. त्यांच्या शरीरातून




**चांद्रयानासह चंद्रावर उतरलेले अंतराळवीर कामात गर्क असताना...**

बाहेर पडणारा कोणताही टाकाऊ भाग खास सीलबंद डब्यांतून पृथःकरणासाठी जगभरच्या प्रख्यात प्रयोगशाळांकडे रवाना केला जाईल. हौस्टनला पोचल्यावर हे पाचजण दुसऱ्या एका प्लॅस्टिक बोगद्यातून स्वागतशाळेत प्रवेश करतील आणि या स्वागतशाळेत या सर्वांना बहुधा एकवीस दिवस मुक्काम करावा लागेल. अंतराळवीर अपोलोमध्ये ज्या खोलीत राहत होते ती खोली पण अशीच हौस्टनला आणली जाईल. अपोलोला मात्र या कसरतीमधून जावे लागणार नाही. कारण, एकतर अपोलो चंद्रापासून दूर प्रदक्षिणा करीत असल्याने चंद्राच्या वातावरणाशी त्याचा संबंध आलेला नाही. त्यातूनही चुकून चंद्रावरच्या वातावरणातील एखादी गोष्ट तेथे आली असल्यास अपोलो पृथ्वीच्या कक्षेत प्रवेश करताना होणाऱ्या उष्णतेमुळे त्याचे निर्जंतुकीकरण आपोआपच झालेले असेल.

चंद्रप्रवासी ज्या स्वागतशाळेत शिरले आहेत, ती स्वागतशाळा म्हणजे आपल्या दृष्टीने अक्षरशः अलिबाबाची गुहा आहे. १९६७ सालापासूनच चंद्रवीरांची वाट पाहत ही स्वागतशाळा उभी आहे. जगातील नामांकित असे १७५ शास्त्रज्ञ कायम या स्वागतशाळेच्या जवळपास वावरत असतात. ज्या क्षणी चंद्रवीर आल्याची बातमी येईल त्या क्षणी त्यांना तातडीने या स्वागतशाळेत प्रवेश करावा लागेल. या स्वागतशाळेचे मुख्यतः तीन विभाग कल्पिलेले आहेत – (१) अंतराळवीर परत आल्यावर त्यांच्यासाठी संसर्गरोधक खोल्या, (२) चंद्रावरून आणलेल्या नमुन्यांच्या

परीक्षणासाठी केलेल्या खोल्या, (३) वरील दोन्ही विभागांचा मदतनीस विभाग. यात प्रयोगशाळेचा कारभार विभागही आला.

चंद्रावरून परत आलेल्या अंतराळवीरांसाठी ज्या खोल्या राखून ठेवल्या आहेत, त्यांमध्ये तीन अंतराळवीर व त्यांचे एकूण पंधरा मदतनीस यांची सोय करण्यात आली आहे. याशिवाय जरूर पडल्यास कोणत्याही क्षणी आणखी साठ माणसांची सोय तेथे होऊ शकेल. या संसर्गरोधक खोल्यांची रचना मोठी वैशिष्टचपूर्ण आहे. या खोल्यांतील हवेचा दाब, खोल्यांबाहेरील हवेपेक्षा थोडा कमी ठेवल्याने आतील हवा आपण घेऊन बाहेर जाण्याची शक्यता नाही. उलट बाहेरून थोडीशी हवा कायम आत येत राहील. स्वागतशाळेत जो दुसरा विभाग आहे त्यात चंद्रावरून आणलेल्या नमुन्यांचे जीवशास्त्रीय, पदार्थवैज्ञानिक आणि रासायनिक परीक्षण होणार आहे. शास्त्रज्ञांना या विभागात प्रवेश करण्यापूर्वी विशिष्ट प्रकारचे सील-बंद कपडे चढवावे लागतील. या विभागातून बाहेर जाण्यापूर्वी या कपड्यांसकट आंघोळ घ्यावी लागेल ! नमुने भरून चंद्रावरून आणलेले डबे या विभागात प्रथम बाहेरून 'ॲसेटिक ॲसिडने' धुवून कोरडे करण्यात येतील. त्यानंतर चंद्रावर हवेचा जितका दाब आहे तितक्या दाबाखाली हे सर्व डबे ठेवून, नंतर आतील नमुने बाहेर काढले जातील. चंद्रावरून आणलेल्या नमुन्यांमध्ये एखादा दुर्मिळ वायू असल्यास त्याचे अस्तित्व समजून यावे यासाठी हे डबे उघडण्यापूर्वी डबे निर्वातात आतील वायू ठेवून गोळा केले जातील आणि त्यानंतर काही तासांतच 'मास स्पेक्ट्रॉमीटर' या यंत्राने या वायूचे संपूर्ण परीक्षण होईल. जीवशास्त्रीय परीक्षण करण्यासाठी हे नमुने, प्रयोगासाठी राखून ठेवलेल्या खास प्रकारच्या वनस्पती व प्राण्यांच्यामध्ये टोचून घालण्यात येतील. यात मानव, इतर सस्तन प्राणी व सस्त-नेतर प्राणी या सान्यांचा समावेश असेल. या प्रयोगासाठी वापरावयाचे उंदीर तर खास प्रकारचे आहेत. हे खास उंदीर निर्जंतुक राहावेत यासाठी उंदराच्या गर्भारशा माद्यांवर, सिझेरियन ऑपरेशन करून—म्हणजे त्यांचे गर्भाशय निर्जंतुक अवस्थेत चिरून—त्यांचे जतन करण्यात आलेले आहे. चंद्रावरून आणलेल्या नमुन्यांचे परीक्षण केल्यानंतर, चंद्रावर काहीतरी सजीव सृष्टी आहे असे समजून आले तर ? तर



प्लॅस्टिकचा बोगदा आणि संसर्गविरोध यान


चंद्रावरून आलेल्या या अनाहूत पाहुण्यांची दुसरी पिढी पृथ्वीवर वाढवून, पुढील प्रयोग करण्याची तयारी ठेवण्यात आली आहे.

अमेरिकन शास्त्रज्ञांच्या या सावधगिरीवर टीका करणारे पण काही लोक आहेत. त्यांच्या मते आतापर्यंत चंद्राचे जे परीक्षण करण्यात आले आहे त्यावरून, चंद्राच्या पृष्ठभागावर व वातावरणात पाणी नाही. तो पृष्ठभाग सूर्यप्रकाशात अतिशय तापतो पण तोच पृष्ठभाग सूर्यप्रकाश नसल्यास अतिशय थंड होतो. या हवेत कोणताही सजीव तेथे असणे शक्य नाही. पण अमेरिकन शास्त्रज्ञ म्हणतात, " त्या तशा वातावरणात एखादा अतिशय वेगळा सजीव वाढणारच नाही, हे आपण पृथ्वीवर राहून कसे सांगू शकू ? – सरासरीच्या गणिताने आपण अधिकात अधिक इतकेच सांगू शकू, की ९९·९९ टक्के सजीव चंद्रावर असण्याची शक्यता नाही !"–आणि म्हणूनच अमेरिकन शास्त्रज्ञ ही सारी काळजी घेणार आहेत. कारण अमेरिकन शास्त्रज्ञांना एक गोष्ट नक्की माहीत आहे.

युद्धात, प्रेमात आणि वैज्ञानिक साहसात सारे काही क्षम्य असते, पण निष्काळजीपणा मात्र अक्षम्य असतो.

युद्धात आणि वैज्ञानिक साहसांत ज्यांना सर्वश्रेष्ठ ठरावयाचे असते त्यांना कोणतीही शक्यता नजरेआड करून भागत नाही ! ○

**[ या सदरातील दोन्ही चित्रे डॉ. जॉर्ज ब्लो यांची कल्पना चित्रे आहेत. ]**





# तुम्ही बचत कुठे ठेवता ते महत्त्वाचे असते

## सर्व बँका सारख्याच नसतात

फक्त स्टेट बँक

- तुमच्या बचतीला जास्तीत जास्त सुरक्षितता देते.
- आणि तिच्या संलग्न बँका यांच्या, भारतात तुम्ही कोठेहि गेलात तरी तुमच्या सहाय्यासाठी २३०० कचेऱ्या आहेत.
- या बँकेचे १८ लाखांवर खातेदार आहेत. लाखो लोकांनी स्टेट बँकेवर विश्वास प्रगट केला आहे. त्यांच्यापैकी कोणाचीच कधीहि निराशा झालेली नाही; कोणाचीहि कधीच
- होणारहि नाही. लक्षात असू द्या, स्टेट बँकेत बचत ठेवणे हेच शहाणपणाचे असते.

**सेवेसाठीं स्टेट बँक**

S.385 MR

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज

## माहे जून १९६९ चे राशिभविष्य
### श्री. गो. जोशी सायनाचार्य

**मेष :** ३१ मेस रवि–मंगळाचा प्रतियोग झाला, तेव्हाच अनिष्ट मंगळाची हवा निघून गेली. आता त्या मंगळाबद्दल धास्ती बाळगण्याचे मुळीच कारण नाही. उलट आजवर सूर्याचे सहकार्य मिळत नव्हते ते आता या महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून मिळू लागेल.

कित्येक दिवसांनंतर थोडाफार अनुकूल काल आपण अनुभवू लागाल. कर्तृत्वाला धार चढेल, स्थगित कार्ये गती घेऊ लागतील, अपेक्षित यश पदरी पडण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. १५ नंतर अनेक कार्यक्रम यशस्वी करून दाखवण्यासाठी धावपळ करावी लागेल. नोकरी धंद्यासाठी केलेले प्रयत्न यश घेऊ लागतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल, प्रियजनांच्या भेटीगाठी होऊ लागतील. उद्योगधंद्यांचे नवे क्षेत्र हस्तगत होईल.

दि. २ ते ७, १२ ते १६, २१ ते २५ या कालात आपल्या अनेक समस्या सुटू लागतील.

**वृषभ :** दि. १० रोजी बुध मार्गी होताच तुमचे अनेक प्रश्न भराभर सुटायला लागतील. तेथूनच एक नवा पर्वकाल सुरू झाल्याचा साक्षाकार होऊ लागेल. मंगळही सहसा तुमच्या प्रगतीच्या आड येऊ शकणार नाही.

नाट्य–चित्रपट क्षेत्रांतील व्यक्तींना तर याच्याइतका चांगला काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल. पंचमस्थ गुरूचे सामर्थ्य या महिन्यापासून प्रत्ययास यायला लागेल. नोकरीधंद्यात प्रगतीकडे आणखी एक पाऊल पुढे पडेल.

कौटुंबिक संघर्ष, व्यावहारिक संघर्ष मिटू लागतील, सांपत्तिक प्रश्न अपेक्षेप्रमाणे सोडवू शकाल, धनिकांचे सहकार्य लाभण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. ३ ते ८, १४ ते १७, २३ ते २८ या काळी अनेक गोष्टींत यश लाभेल.

**मिथुन** : लाभस्थानातील एकटा शुक्रही तुमच्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल करायला समर्थ ठरेल. शिवाय बुधाची मार्गी अवस्थाही तुम्हांला हरघडी उपयोगी पडेल.

या महिन्यातच तुमच्या नोकरीतील अनेक अवघड प्रश्न भराभर सुटू लागतील. प्रगतीच्या मार्गातील अडथळे दूर होत असल्याचे दिसू लागेल. वैज्ञानिक क्षेत्रात, संशोधक विभागात तर तुमचे श्रेष्ठत्व निरपवादपणे सिद्ध होईल. दि. १०पासून नवी क्षितिजे दिसू लागतील. कर्तृत्वाचा परीघ विशाल बनू लागेल. दुसरा पंधरवडा तर सर्वांगाने प्रगतीचा जाणवायला लागेल.

पत्रव्यवहार वाढेल, आणि त्यातूनच नवे व्यवसायक्षेत्र दृष्टिक्षेपात येईल. सामाजिक क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करण्याची संधी लाभेल.

दि. ६ ते १०, १७ ते २०, २५ ते ३० या काली अनेक प्रश्न सुटतील.

**कर्क** : कोणत्याही कार्याला व्यवहारधर्म म्हणून असतो. आणि त्याचे निष्ठेने पालन करणाऱ्यांना सहसा अपयश येऊ शकत नाही. सध्याचा आपला काल असाच आहे. गेल्या आठवड्यातील सूर्य–गुरु त्रिकोणापासूनच तुमची प्रगतीकडे वाटचाल सुरू झालेली आहे. या महिन्यात ती चांगलीच गती घेऊ लागेल.

प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील, नोकरीधंद्यांत दोन पावले पुढे जाण्याची संधी लाभेल, धनिकांचे साहाय्य मिळाल्यामुळे नवे व्यवसायक्षेत्र उभारण्यात यश मिळवाल.

सामाजिक व राजकीय क्षेत्रांतही आघाडीवर राहण्याची संधी लाभेल, नव्या कल्पना कृतीत उतरतील. साहित्य–कला क्षेत्रांतही महत्त्वाचे स्थान लाभेल.

दि. ८ ते १२, १६ ते २१, २४ ते २९ या काली अपेक्षित यश पदरी पडावे.

**सिंह** : चौथ्या मंगळाच्या डोकेदुखीवर आता प्रभावी उपाय सापडू शकेल. पूर्वी-इतका अनिष्ट काल आता राहिलेला नाही. अनेक व्यथाविवंचना मिटू लागतील, स्थावराचा प्रश्न पूर्वीइतका अवघड वाटू शकणार नाही. सांपत्तिक ताण निश्चितच कमी जाणवायला लागेल.

या महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात तर सूर्य एकादशात येताच तुमचा सारा अनिष्ट काल इतिहासजमा झाल्यासारखे जाणवायला लागेल. दि. १० रोजी बुध मार्गी झाल्यापासूनच सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

कलाक्षेत्रात भरीव व आकर्षक कार्य घडेल, यांत्रिक–तांत्रिक व्यवहारात अपेक्षे-बाहेर यश मिळवाल.

दि. १० ते २० आणि २५ ते ३० या काली सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडेल.

**कन्या** : गेल्या महिन्याप्रमाणे याही महिन्यात आपली प्रगतीकडे घोडदौड सुरूच राहील. बुधाच्या मार्गीपणामुळे प्रगतीचा वेग अधिकच वाढेल. आठवा शनी धास्ती

बाळगण्यासारखे काही करील असे दिसत नाही.

हा साराच महिना आपल्या अंगीकृत कार्याला उत्थान देणारा जाणवेल. आपण अंगीकरलेले नवे तंत्र पूर्णत्वाने यशस्वी ठरल्याचा प्रत्यय यायला लागेल.

सामाजिक–राजकीय क्षेत्रांतील महत्त्वाच्या जबावदाऱ्या उचलाव्या लागतील आणि त्या अपेक्षेवाहेर यशस्वीही ठरू लागतील.

राष्ट्रीय दौऱ्यावर निघावे लागेल, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्यावा लागेल. मंगल कार्ये पार पडतील.

दि. ३ ते ७, १२ ते १९, २३ ते २७ सर्वोत्तम यशाचा व लाभाचा काल.

**तूळ :** शनि-मंगळांबद्दल धास्ती बाळगण्याचे आता कारण नाही. गुरू फारसा अनुकूल नाही म्हणूनही फारसे काही नडणार नाही.

दि. १५ रोजी सूर्य भाग्यस्थानी येताच नवा प्रकाश दिसू लागेल. प्रगतीच्या नव्या वाटा दिसायला लागतील. इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल आणि आजवर जे करता आले नाही ते या वेळी विनासायासाने करून दाखवू शकाल.

नाट्यनृत्य, संगीत, चित्रकला या क्षेत्रांत तर तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही. नोकरीत बदली-बढतीचे योग दिसू लागतील. मंगलकार्याचा प्रश्न मोठ्या धूर्तपणे सोडवू शकाल.

दि. १ ते ७, १५ ते २३, २७ ते ३० सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडावे.

**वृश्चिक :** विस्मयकारक आणि अनन्यसाधारण घटना घडवून आणणारा हा महिना आहे- चांगल्या आणि वाईटही. वक्री मंगळाचे हृदयपरिवर्तन झाल्यासारखे क्षणभर वाटेल. पण ती जाणीव दीर्घ कालीन ठरेल, असे दिसत नाही.

सांपत्तिक, अनपेक्षित धनलाभाला हा महिना जसा पोषक आहे, तसाच अनपेक्षित स्वरूपाचे आघात करणाराही जाणवेल.

मंगळाचे संपूर्ण राश्यंतर घडल्याशिवाय खऱ्या स्वास्थ्याची अपेक्षा करायला जागाच नाही.

पण एकादशातील गुरू तुम्हांला याही अनिष्ट कालातून निभावून नेईल. या वेळी प्रकृतीची अधिक काळजी घ्या आणि न पेलणाऱ्या जबाबदाऱ्या उचलू नका.

दि. ३ ते १०, १८ ते २४ या कालात अपेक्षित यश पदरी पडावे.

**धनू :** धनुराशी व्यक्तींच्या बाबतीत अजूनही फारसे आशादायक असे सांगण्यासारखे नाही. हाही महिना धावपळ-धडपडीचा जाणवेल. गुप्त शत्रुत्व, सांपत्तिक ताण, व्यावसायिक संघर्ष हे प्रकारही थोड्याफार प्रमाणांत याही महिन्यांत आपणांस अनुभवावे लागणार आहेत. गेल्या महिन्यातील अनावश्यक व अवास्तव खर्चाचा परिणाम या महिन्यात तीव्रतेने जाणवेल. प्रतिष्ठा धोक्यात येते की काय,

याची भीती क्षणाक्षणाला जाणवायला लागेल.

प्रत्यक्षात तसे घडेलच असे नाही. मात्र सतत जपून वागायला हवे. कौटुंबिक संघर्षामुळेही मन उद्विग्न बनेल. इष्टमित्रांच्या अभिवचनांवर फारसे अवलंबून राहण्यात अर्थ नाही.

दि. ६ ते ९, २० ते ३० हा काल थोडेफार यश पदरी टाकील.

**मकर :** हा महिना आपणांस अनेक बाबतींत चिरंतन स्मृतीचा ठरावा, अशीच या महिन्यातील ग्रहस्थिती आहे. एकादशातील मंगळ अधिक कार्यक्षम ठरेल आणि भाग्यातील गुरूचे सामर्थ्य वृद्धींगत झालेले आहे.

आपली सारी कामे गतिमान ठरतील, सारे प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटू लागतील, नोकरीधंद्यातील प्रगतीच्या वाटा निर्वेध, निष्कंटक बनतील. सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करून दाखवाल.

गेल्या महिन्यातील अनपेक्षित लाभामुळे व्यवसायधंद्याचे स्वरूप अधिकच आकर्षक बनेल. बढतीबदलीचे योगही स्पष्टपणे दिसू लागतील.

दि. ३ ते ७, १३ ते १८, २३ ते ३० सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडेल.

**कुंभ :** दशमातील मंगळ आता अधिक सामर्थ्यसंपन्न बनलेला आहे आणि दि. १५ पासून सूर्यही आपणांस हवातसा अनुकूल होणारा आहे.

या महिन्यात आपल्या जीवनात अनेक नावीन्यपूर्ण घटना घडू लागतील. स्थानांतर घडेल, व्यावसायिक क्षेत्र विस्तारेल, नव्या जबाबदाऱ्या अंगावर पडतील, नव्या वातावरणाशी घनिष्ठ संबंध येईल, आकर्षक–अभिनव असे काही या वेळी घडावे. दूरचा प्रवास घडेल. आणि त्या प्रवासामुळेच आपले जीवन बहरास येऊ लागेल.

व्यवसायधंद्यातही आपण चार पावले पुढे जाल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील.

दि. १ ते ५, १० ते १६, २१ ते २७ विशेष प्रगतीचा काल जाणवेल.

**मीन :** सूर्य पराक्रमस्थानी आहे तोपर्यंतच तुमच्या साऱ्या योजना तुम्हांला अपेक्षेप्रमाणे यशस्वी करून दाखवता येतील. मंगळही तुमच्याशी सहकार्य करायला उद्युक्त आहे.

पहिल्या ८–१० दिवसांत आपले अनेक प्रश्न सुटावेत. व्यवसायधंद्याचे स्वरूप अधिक आकर्षक बनेल. नाट्य, साहित्य, संगीत या क्षेत्रांत अत्यंत महत्त्वाचे कार्य करून दाखवाल.

दुसराही पंधरवडा तसा अनिष्ट नाही, पण कामे मंदावतील, अनेकांकडून अंगीकृत कार्यात विघ्ने आणली जातील. सांपत्तिक चणचणही थोडीफार जाणवू लागेल. तरीसुद्धा हा महिना अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

दि. २ ते १०, १६ ते २१, २४ ते २७ अपेक्षित यश देणारा काल. ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

## व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक — वि. स. वाळिंबे

किंमत — अठरा रुपये

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७—ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर